# महिलांचे हक्क व अधिकार

( इंदिरा महिला योजने अंतर्गत महिलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम )

महिला व बाल विकास विभाग

DEPARTMENT OF WOMEN & CHILD DEVELOPMENT


## महिला आर्थिक विकास महामंडळ मर्या.

गृहनिर्माण भवन, पोटमाळा, कलानगर, बांद्रा पूर्व,

मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी : ६४३५५७४/६४३५७२८/६४३५६२९

# महिला व बाल विकास विभाग

(महाराष्ट्र शासन)

# महिलांचे हक्क व अधिकार

## दिनांक : ३ मार्च, २००१

महिला व बाल विकास विभाग (महाराष्ट्र शासन),
३ रा माळा, नवीन प्रशासन इमारत,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
☎ : २८२ ४९ ६६

# मनोगत

**२६** जानेवारी २००० रोजी भारतीय घटनेला ५० वर्षे पूर्ण झाली. भारतरत्न डॉ. बाबासांहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या घटना समितीने जगातील बदलत्या वातावरणाची नोंद घेऊन व भारतातील समता चळवळीचे नेते म्हणून महिलांना समान हक्क दिले. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीने अत्यंत जाणीवपूर्वक स्त्रियांना स्वातंत्र्य लढ्याच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेतले. औद्योगिक दृष्ट्या महाराष्ट्र हे देशातील सर्वात पुढारलेले तसेच पुरोगामी राज्य. महाराष्ट्राला १५० वर्षाची उज्वल अशी परंपरा आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तीनही घोषणा आधुनिक युगाच्या प्रेरक शक्ती आहेत. महाराष्ट्रात म. ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, म. कर्वे इ. समाजसुधारकांनी समाज जागृतीसाठी अखंड परिश्रम घेतले. त्यापासून स्फूर्ती घेऊन पं. रमाबाई, रखमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे अशा कितीतरी ज्ञात-अज्ञात स्त्रियांनी स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री प्रश्नांची मांडणी करण्यास हिरीरीने सुरुवात केली. महाराष्ट्र शासनानेही यात मोलाची साथ दिली आहे. गर्भलिंग चिकित्सा विरोधी कायदा, महिला आयोगाची स्थापना, महिला धोरण असे अनेक सामाजिक कायदे आणि सुधारणा सर्वप्रथम करून महाराष्ट्राने देशाला मार्ग दाखविला आहे.

स्त्रियांसाठी अनेक नवीन योजना सुरु केल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात या योजना माहितीअभावी योग्य लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. असाच आजवरचा अनुभव आहे. स्व. राजीव गांधीच्या काळात झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर महाराष्ट्रात एक लाखाच्या वर स्त्रिया ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवर निवडून येत आहेत. त्याचबरोबर स्त्रियांच्या बचत गटांच्या माध्यमातून एक नवी आर्थिक आणि सामाजिक शक्ती उदयाला येत आहे. स्त्रियांचे हक्क आणि नव्या योजना यांची जाणीव झाल्यास पुढील शतकात महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद या शक्तीमध्ये निश्चितच आहे. याची जाण ठेवून ***स्त्रियांचे अधिकार आणि योजना यांविषयीची सविस्तर माहिती वैचारिक भूमिकेसह लोकांपर्यंत पोहोचावी म्हणून हा प्रयत्न.***

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| १. | पार्श्वभूमी | ७ |
| २. | वारसा कायदा | ८ |
| ३. | अत्याचार | १० |
| ४. | हुंडा | १७ |
| ५. | बलात्कार | २० |
| ६. | मानसिक छळ | २३ |
| ७. | अपहरण | २४ |
| ८. | बालकांवरील अत्याचार | २५ |
| ९. | सुधारित माहेर योजना | २७ |
| १०. | देवदासी पुर्नवसन योजना | २८ |
| ११. | गर्भपात करून घेण्याचा अधिकार | ३० |
| १२. | दारूची समस्या | ३२ |
| १३. | विवाहविषयक कायदे | ३४ |
| १४. | पोटगीचा कायदा | ४० |
| १५. | हिंदू दत्तक भरणपोषण कायदा | ४४ |
| १६. | घटस्फोट | ४५ |
| १७. | स्त्री शिक्षण व योजना | ५१ |
| १८. | समान वेतनाचा अधिकार | ५७ |
| १९. | स्त्रियांना संरक्षण देणारे भारतीय दंड विधानातील विशेष कायदे | ५९ |

# पार्श्वभूमी *

**स्वा**तंत्र्यानंतर प्रजासत्ताक भारताच्या राज्य घटनेने स्त्रियांचा समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला. स्त्रिया तसेच अन्य दुर्बल घटकांचे संरक्षण करण्यासाठी खास सवलती आणि कायदे करण्याची तरतूदही घटनेत केली गेली. जीवनाच्या सर्व अंगात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यात कायद्यांचे महत्त्व आहे. विषमता,दारिद्रय, पुरूषप्रधानता व पितृसत्ताकता, जातीभेद, वर्णभेद, वंशभेद, धार्मिक तणाव यामुळे घटनेने दिलेली समानता प्रत्यक्षात येत नाही.

यासाठी स्त्रीविषयक कायद्यात कालमानाप्रमाणे बदल आवश्यक आहेत. मात्र केवळ कायदे करून भागत नाही. कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी कायदे पुस्तकात किंवा न्यायालयापुरतेच मर्यादित राहता कामा नय़ेत. सर्वसामान्य स्त्रियांनाही त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव हवी. स्त्रियांपर्यंत ही माहिती पोहचावी म्हणून पुढे सोप्या भाषेत विविध कायद्यांची माहिती दिली आहे.

आपण आधी नागरिकांच्या मूलभूत अधिकारांबद्दल जाणून घेऊया. हे अधिकार व्यापक आहेत व सहा भागात आहेत.

- समानतेचा अधिकार
- स्वातंत्र्याचा अधिकार
- शोषणाला विरोध करण्याचा अधिकार
- धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार
- शिक्षण व संस्कृतीचा अधिकार
- घटनेच्या संवैधानिक संरक्षणाचा अधिकार

घटनेच्या मूलभूत हक्कांमध्ये समानतेचा अधिकार हा स्त्रियांसाठी सर्वांत महत्त्वाचा आहे.

# वारसा कायदा *

**घ**टनेने स्त्रियांना समान मानले असले तरी प्रत्यक्षात बाईला समान हिस्सा मिळत नाही असे दिसते. असे का ?

महाराष्ट्र राज्यात १९९४ पूर्वी ही स्थिती होती. १९९४ साली हिंदू वारसा कायद्यात एक महत्त्वाची दुरुस्ती केली गेली. अशी दुरुस्ती करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव राज्य आहे. त्यानुसार २२ जून १९९४ नंतर मुलीला मुलाप्रमाणेच जन्मतःच मालमत्ता विषयक अधिकार मिळाले आहेत. मात्र २२ जून १९९४ पूर्वी झालेल्या वाटणीस या कायद्यातील तरतूद लागू नाही.

१) या कायद्यानुसार जोपर्यंत संयुक्त कुटुंबाची सामायिक मालकी आहे. (वाटणी झाली नाही तोवर) मुलगी वाटणी मागू शकते.

२) मुलगी स्वतंत्रपणे कुठल्याही भागाचा ताबा घेऊ शकत नाही.

३) सामायिक मालकी असल्याने उत्पन्नही सामायिक (एकत्र) असेल आणि त्यातूनच खर्चही होईल.

४) मालमत्तेतून मिळालेल्या फायद्याइतकीच कर्जाची वा तोट्याची जबाबदारीही मुलीला घ्यावी लागेल. अर्थातच ती तिच्या हिश्श्याच्या प्रमाणात असेल.

# बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट १९५१

**शासन निर्णय क्रमांक एस.टी.पी.१०९४/सी.आर.३१५९/एम.१ दि.१०-१०-९४**

महिलांचे स्थान समाजात पुरुषांबरोबरीने असावे या भावनेने शासनाने महिला धोरण घोषित केले आहे. यात अंतर्भाव केल्यानुसार महिलांच्या संपत्तीविषयक पोटगी, हिसाचार व घटस्फोट विषयक केसेसना कोर्ट फी माफ होत आहे. यानुसार या तक्रारीसाठीचे अर्ज करताना लागणारी फी, दावा दाखल करताना, अपील करताना अथवा स्मरणपत्रे पाठवताना लागणारी फी स्त्रियांना माफ करण्यात येत आहे.

# राहत्या घराची मालकी

**बाई लग्न झाल्यावर पतिघरी जाते. पण त्या घरावर तिचा काहीच हक्क रहात नाही. असे का?**

सर्वसाधारणतः पतिपत्नीचा बेबनाव झाला की सहजगत्या पत्नीला घरातून चालती हो असे सांगितले जाते. बाई संसारासाठी, कुटुंबासाठी कितीही खपली तरी घर-संसार यावर नवऱ्याचेच नाव असते. ही परिस्थिती बदलण्यासाठी आता नवा नियम करण्यात आला आहे. त्यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्था, जमिनीचा पट्टा, भूखंड हे आता पति-पत्नी या दोघांच्या सामायिक मालकीचे होईल.

# गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग.

**१) प्रंरक्षण प्राप्त झोपडी रहिवाशांना द्यावयाची ओळखपत्रे कुटुंबप्रमुख व त्याच्या पत्नीच्या नावे देण्याबाबतः शासन निर्णय क्रमांक : प्रवम १०९४/३६२५/१०.८.९४**

यापुढे झोपडपट्टीवासीयांना दिल्या जाणाऱ्या ओळखपत्रातील पहिल्या पृष्ठावर पुरुष कुटुंबप्रमुखाच्या सोबत झोपडीचे मालकी हक्कासंदर्भात कुटुंबप्रमुखाच्या कायदेशीर पत्नीचे संयुक्त मालकी दर्शविण्यासाठी नाव नोंदवण्यात यावे . झोपडीधारक अविवाहित असेल तर त्याच्या विवाहानंतर कायदेशीर पत्नी सहलाभधारक होईल.

**२) शासन स्वेच्छाधिकाराखाली १० टक्के व २ टक्के मधून सदनिका व भूखंड वितरणाचे आदेश पती/पत्नी यांच्या संयुक्त नावे निर्गमित करणेबाबत : शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १४९४/८९४५/ स्वेनि. -१/३.५.१९९४.**

वरील सदनिका / भुखंड लाभार्थीचे नावे वितरित झाल्यानतर तत्संबंधीचे करारपत्र पती/पत्नी यांच्या संयुक्त नावे करण्यात यावे व तशी कागदोपत्री नोंद ठेवावी.

**३) इंदिरा आवास योजना : घरकुलांची सयुंक्त मालकी शासन निर्णय क्रमांक इ आया १०९४ / प्र .८१/ ब ल १७/ दि. १३.१२.९४.**

इंदिरा आवास योजनेखाली बांधण्यात येणारी घरे पती-पत्नीच्या संयुक्त नावे द्यावीत तसेच लाभधारक अविवाहित असेल तर लग्नानंतर आपोआप सहलाभधारक होईल अशी अट घालण्यात येईल.

# अत्याचार

*

**भ**य हा विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे असे शासनाचे ठाम मत आंहे. प्रत्येक महिलेला शारीरिक आणि मानसिक हिंसाचाराच्या भीतीपासून मुक्त असे जीवन जगता आले तरच खऱ्या अर्थाने विकासाला आवश्यक असा आत्मिक फुलोरा निर्माण होऊ शकतो.

केवळ स्त्री म्हणून अनेकदा स्त्रियांना शारीरिक, मानसिक आणि लैंगिक अत्याचाराला तोंड द्यावे लागते. स्त्रिया धीट आणि समर्थ होऊ लागल्या तर त्यांना त्यांच्या दुय्यम स्थानावर ढकलण्यासाठी (त्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी) अत्याचारांचा वापर पुष्कळदा केला जातो. किंबहुना स्त्रीचे दुय्यम स्थान हेच तिच्यावरील अनेक अत्याचारांमागील प्रमुख कारण आहे. समाजाचे झपाट्याने होणारे गुन्हेगारीकरण, माध्यमातून -चित्रपटातून सातत्याने केले जाणारे अत्याचारांचे चित्रीकरण, कायद्यामधील ढिलाई, एकूण सरासरी यंत्रणेमधील स्त्रियांवरील अत्याचाराविषयी उदासिनता किंवा बेफिकीरी, पुरुषी दृष्टिकोन यामुळे अत्याचारांना एकप्रकारे उत्तेजनच मिळते.

स्त्रियांवरील अत्याचार हे केवळ वैयक्तिक स्वरुपाचे (खाजगी) नसून सामाजिक आहेत. या स्त्री मुक्ती चळवळीच्या घोषणेमुळे अनेकांना जाग आली. १९७४ च्या `स्त्रियांचा दर्जा` या अहवालात स्त्रिया आणि अत्याचार हा विषयच नव्हता. आज मात्र या अत्याचारांवर जाणिवपूर्वक आकडेवारी आाणि विश्लेषण उपलब्ध आहे आणि गुन्हे नोंदणाऱ्यांची संख्या वाढते आहे हेही नमूद करायला हवे.

## मानसिक छळ कसा ठरविणार ?

स्त्रियांवरील शारीरिक वा लैंगिक अत्याचारांची नोंद होते पण मानसिक छळ मात्र खूपदा दुर्लक्षितच राहतात.

- तासन् तास काम करायला लावणे
- उपाशी ठेवणे
- आजारपणाकडे दुर्लक्ष करणे
- सतत नावे ठेवणे
- शिव्या देऊन पाणउतारा करणे

या गोष्टी पती किंवा कुटुंबियांकडून सातत्याने केल्या जातात. ४९८ (अ) कलमाची हुंडाविरोधी कायद्यात भर पडल्यापासून मानसिक छळाची नोंद घेतली जाऊ लागली.

रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी अनेकदा छेडछाडीच्या स्वरुपात अत्यंत अपमानास्पद, अश्लिल बोलणे किंवा अश्लिल हावभाव करुन स्त्रीला अगदी नको जीव करून सोडण्यासारखे प्रसंग दृष्टीस पडतात.

स्त्रियांवर होणारे अत्याचार हे वैयक्तिक असतात हे खरे पण ते केवळ स्त्री म्हणून होणारे अत्याचार असल्यामुळे त्याला सामाजिक आणि राजकीय संदर्भ असतो.

स्त्रीचे समाजातील स्थान, समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टीकोन, समाजातील स्त्री-पुरुषांसाठी दुहेरी नीतीमूल्ये या सर्वांमुळे पदोपदी कुचंबणा होते. पण या समस्यांना ती जबाबदार नसून भोवतालची परिस्थिती जबाबदार असते हे समस्याग्रस्त स्त्रीला समजत नाही. आपण एकट्या आहोत आणि आपल्याच वाट्याला आलेले भोग आहेत या कल्पनेने ती खचून जाते. निमूटपणे सहन करीत राहते. समस्याग्रस्त स्त्रीला तिच्या प्रश्नाचे बाह्यस्वरुप, अंतरस्वरुप आणि सामाजिक परिणाम हे कळण्यासाठी स्त्री चळवळीने गेली काही वर्षे अखंड प्रयत्न केला आहे. कौटुंबिक छळावर नवा प्रकाशझोत टाकला आहे. त्यातून मार्ग काढण्याचा आणि व्यक्ती म्हणून जगण्यांचा स्त्रीचा अधिकार प्रस्थापित केला आहे.

## स्त्रियांच्या अनंत समस्या आहेत. कोणत्या कारणांखाली तक्रार करता येते ?

स्त्रियांच्या वैयक्तिक समस्या या खूप गुंतागुंतीच्या असल्यातरी त्याचे ढोबळमानाने खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

- छेडछाड
- शारीरिक जबरदस्ती
- अपहरण
- बलात्कार
- पैशासाठी छळ, खून / आत्महत्या

- मारहाण
- व्यसनाधीन नवऱ्यांकडून मारहाण
- मानसिक छळ
- क्रुर वागणूक
- भ्रूणहत्या, बालिका हत्या
- अंधश्रंद्धा, जाचक रुढींमुळे छळ
- कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ
- मुली देवाला सोडणे
- बालिकांवरील अत्याचार
- अनेक लग्ने व बाहेरख्यालीपणा
- जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे
- युद्ध वा दंगलीमध्ये होणारा स्त्रियांवरील अत्याचार
- स्त्रियांचा आंतरराष्ट्रीय व्यापार
- पतीने दुसरा विवाह करुन सोडून देणे

## छळाबद्दलची तक्रार कोणाकडे करायची ?

'नवऱ्याने मारलं आणि पावसानं झोडलं' तर तक्रार कोणाकडे करायची अशी जुनी म्हण आहे. तक्रार केली तर कुटुंबाची बदनामी होईल अशी भिती स्त्रियांना घालण्यात येत असे. शिक्षणाची पातळी आणि कायद्याचे ज्ञान वाढू लागल्यावर स्त्रिया आता तक्रार करायला पुढे येत आहेत. तक्रार जिथे नोंदविता येईल अशी ठिकाणे

### १) पोलीस स्थानक

स्त्रियांना पोलीस स्थानकापर्यंत मोकळेपणाने जाता यावे यासाठी पोलीसांच्या मुख्य प्रवाहात ३० टक्के आरक्षण ठेवून महिलांची भरती केली जात आहे. नवप्रविष्ट

महिला पोलिस शिपायांना मूलगामी प्रशिक्षण देण्यासाठी सोलापूर येथे नवीन प्रशिक्षण शाळा सुरु करण्याबाबत.

## शासन निर्णक क्रमांक : ०३९३/सी आर ५७/पोल ५ अ/दि. ५-९-९४.

राज्यातील महिला पोलिस शिपायांच्या पदात वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून नवप्रविष्ट महिला पोलिस शिपायांना पुरुष पोलिस शिपायांप्रमाणेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या देण्याचा तसेच पुरूष पोलिस शिपायांच्या प्रशिक्षण कालावधीइतके प्रशिक्षण देण्याचा शासन निर्णय घेत आहे. त्यासाठी सोलापूर येथे पोलीस विभागाच्या अखत्यारित असलेल्या जागेत नवप्रविष्ट महिला पोलिस शिपायांना मूलगामी प्रशिक्षण देण्याकरिता ५०० प्रशिक्षणार्थींची क्षमता असलेली स्वतंत्र महिला प्रशिक्षण शाळा सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच या संदर्भातील शा. नि. क्र. ०३९४/४११/पोल. ५(अ) द्वारा महिला पोलिसांना समान दर्जा व कर्तव्ये देण्याबाबत आहे. त्यासाठी महिला व पुरूष पोलीस वर्गासाठी एक संवर्ग करण्याचा प्रश्न विचाराधीन आहे. तसेच सेवाभरती प्रशिक्षण सारखे ठेवण्यात येत आहे.

## २) स्त्री संघटना

पीडित स्त्रीला आपली कैफियत मोकळेपणाने मांडता यावी यासाठी स्त्री संघटनांनी ठिकठिकाणी सल्ला केंद्रे, मदत केंद्रे सुरु केली. ही प्रक्रिया जगातील बहुतेक सर्व देशात सुरु झाली. कुटुंबातील प्रश्न सामोपचाराने सोडविले जावेत, त्याचबरोबर आपल्या प्राणांची किंमत देऊन कुटुंब टिकविण्याची पाळी कुठल्याही स्त्रीवर येऊ नये हेही त्यामागील उद्दिष्ट आहे. अशारितीने कुंटुंबातील समस्यांमध्ये स्त्री संघटनांनी एकप्रकारे सामाजिक हस्तक्षेपच केला. गेल्या काही वर्षांच्या अनुभवातून हा हस्तक्षेप प्रभावी व्हावा आणि स्त्रियांच्या हिताचा दृश्य परिणाम लोंकाना दिसावा यासाठी अनेक मार्गांचा अवलंब होऊ लागला.

**समुपदेशन** : दोन्ही बाजूंशी विचारविनियम करून सामोपचाराने निर्णय घेण्यासाठी केलेले प्रयत्न, गृहभेटी इ.

**कुटुंबातील व्यक्तींचे सहकार्य** : मित्रपरिवार शेजारी, व्यवसाय/कंचेरीतील वरिष्ठ इ. चे सहकार्य.

**कायदेशीर मदत** : पोलिस ठाणे किंवा न्यायालय इथे दाद मागण्यासाठी मदत.

**तात्पुरता निवारा** : पीडित स्त्रियांना संकटप्रंसगी तात्पुरत्या निवाऱ्याची, आधाराची सोय करणे

**पुनर्वसन** : पीडित स्त्रिला स्वत:च्या पायावर उभे करून आत्मविश्वासाने जगायला प्रवृत्त करणे.

**जाहीर कृती** : सामाजिक हस्तक्षेपाच्या प्रक्रियेतील एक विचारपूर्वक उचलावे लागणारे पाऊल, समस्याग्रस्त स्त्री परिसरात लोकजागृती करून स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी सामाजिक जाणिव वाढविणे आणि अपराधी व्यक्तींवर सामाजिक दडपण आणणे.

### ३) महिला आयोग

अनेकदा सगळ्या प्रकारचे प्रयत्न करूनही पीडित स्त्रीला न्याय मिळत नाही. तेव्हा अशी महिला महिला आयोगापुढे दाद मागू शकते.

# पोलिस ठाण्यावरील अधिकार

### अटक

पोलिसांनी एखाद्या अपराधी व्यक्तीला आपल्या कब्जात घेणे म्हणजे अटक करणे.

- अटक करतेवेळी,अटक कशासाठी केली जात आहे हे पोलिसांना सांगावे लागेल.
- तुमचा गुन्हा काय आहे हेही सांगणे आवश्यक आहे.
- फक्त तुमच्या विरूद्ध तक्रार आली आहे एवढे सांगणे पुरेसे नाही. पोलिसांना तुमचा गुन्हा सांगणे गरजेचे आहे.
- अटक करताना जोर जबरदस्ती करणे बेकायदेशीर आहे.
- पोलिस ठाण्यात नेण्यासाठी कोणालाही बेडया ठोकता येत नाहीत.
- काही अपराधांसाठी आपल्याला वॉरंट शिवायही अटक केली जाऊ शकते.
- आपण कायद्याची (वकीलाची )मदत घेऊ शकता.

- तुमच्या सुरक्षिततेसाठी तुमच्या ओळखीचे किंवा नात्यातल्यांना तुमच्या बरोबर पोलिस स्टेशनला यायचा हक्क आहे.
- अटक केल्यावर लगेचच पोलिसांना मॅजिस्ट्रेटला अटक केल्याचा रिपोर्ट द्यायला हवा.
- अटक केलेल्या व्यक्तीस चोवीस तासात मॅजिस्ट्रेटच्या समोर सादर करणे गरजेचे आहे.
- मॅजिस्ट्रेटच्या आदेशाशिवाय चोवीस तासांच्यावर तुरुंगात ठेवणे बेकायदेशीर आहे.

## पोलिस स्टेशनमध्ये

- पोलिस स्टेशनमध्ये त्रास देणे, मारझोड करणे किंवा अन्य यातना देणे एक गंभीर अपराध आहे.
- स्त्रियांना फक्त स्त्रियांसाठी असलेल्या खोलीतच ठेवता येते.

## जामीन

पोलिसांनी अटक केल्यानंतर मामल्याची सुनवाई होईपर्यंत अटक केलेल्या व्यक्तीकडून काही गोष्टींची हमी घेऊन सोडू शकता येते. त्याला जामीन म्हणतात. अपराध दोन प्रकारचे असतात. जामिन मिळणारे आणि जामीन न मिळणारे.

- जामिन मिळणाऱ्या अपराधामध्ये अटक केलेल्या व्यक्तीला जामिनावर सोडण्याचे अधिकार मॅजिस्ट्रेटला.
- अटक करतेवेळी अपराध कोणत्या प्रकारचा आहे, जामिन मिळणारा की न मिळणारा हे पोलिसांनी सांगायला हवे.
- जामिनाच्या वेळी पैसे दिले जात नाहीत. केवळ जामिनाच्या प्रपत्रात रक्कम लिहिली जाते. हिला हमीपत्र/जामिननामा असे म्हणतात.
- जामिन मिळणारा अपराध असेल तर जामिन झाल्यावर पोलिसांना तुम्हाला ताबडतोब सोडावे लागते.

## चौकशी

एखाद्या अपराधासाठी किंवा अपराधाची शंका आल्यावर जर पोलिसांना कोणाला

चौकशीसाठी बोलवायचे असेल तर चौकशी करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला लेखी आदेश द्यावे लागतील. १५ वर्षाखालील मुलाला चौकशीसाठी पोलिस स्टेशनवर बोलाविता येणार नाही व महिलेला रात्री पोलिसस्टेशनवर चौकशीसाठी बोलविता येत नाही.

## झडती

- फक्त एखादी महिला पोलिस अधिकारीच एखाद्या महिलेच्या शरीराची झडती घेऊ शकते.
- पुरुष पोलिस अधिकारी आपल्या घराची किवा दुकानाची झडती घेऊ शकतात.
- झडतीसाठी नेहमीच वॉरंटची गरज नसते.
- झडती घेण्याआधी झडती घेणाऱ्याचीही झडती होऊ शकते.
- कोणत्याही झडती किवा पंचनाम्याच्या वेळी आजुबाजूला राहणारे कोणतेही दोन नि:पक्षपाती आणि प्रतिष्ठित व्यक्ती हजर असणे आवश्यक आहे.
- झडतीचा पंचनामा बनविणे आवश्यक आहे.

## कोर्टात

- आपल्याला वकीलाची मदत घेण्याचा अधिकार आहे.
- गरीब असल्यास आपल्याला कायद्याचा मोफत सल्ला मिळण्याचा अधिकार आहे.

## अपराधाचा अहवाल (रिपोर्ट)

रिपोर्टचा अर्थ असा की आपण पोलिसांना जाऊन एखादा अपराध झाल्याचे सांगणे ह्याला प्रथम सूचना रिपोर्ट किवा एफ. आय. आर. म्हणतात. हा रिपोर्ट अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

## रिपोर्ट कसा लिहिला जातो ?

- रिपोर्ट तोंडी किवा लिखित स्वरुपात असू शकतो.
- तोंडी दिलेला रिपोर्ट लिहून झाल्यावर पोलिस आपल्याला वाचून दाखवतील म्हणजे रिपोर्ट नीट लिहिला आहे याची आपल्याला खात्री होईल.
- रिपोर्टची एक सत्य प्रत आपण पोलिसांकडून मागून घेतली पाहिजे.

**स्त्रियांवरील अत्याचारांच्या काही प्रकारांचे सामाजिक स्वरुप थोडे तपशीलवार पाहूया**

# हुंडा *

हुंडा कशाला म्हणायचे ?

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ प्रमाणे हुंडा म्हणजे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीतीने लग्नापूर्वी, लग्नाचेवेळी अथवा लग्नानंतर देऊ केलेली रक्कम किंवा वस्तू.

हुंडा देण्याचा किंवा घेण्याचा ठराव झाला असेल तर तो ठराव अवैध राहील.

ऑगस्ट १९८६ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीप्रमाणे आता या हुंडा प्रतिबंधक कायद्यातील गुन्हा हा जामीनपात्र म्हणून राहिला नाही.

हुंडयाचा प्रश्न केवळ लग्नाच्या वेळी केल्या जाणाऱ्या देण्याघेण्याच्या (म्हणजे खरं तर देण्याच्या) बोलण्यांपासून सुरु होत नाही. तो कुटुंबातील मोठ्या माणसांच्या आणि मुलामुलींच्या जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा, जोडीदार शोधण्याच्या पद्धती, या सगळ्यांशी अतूटपणे जोडला गेला आहे. प्रत्येक गोष्टीचे पैशात मोल करण्याची विघातक दृष्टी समाजात पसरते आहे. झटपटच्या या युगात पैसा मिळविण्याचा हा अगदी सोपा मार्ग लोकांना उपलब्ध आहे. त्यामुळे मुलाचे शिक्षण जेवढे जास्त तितकी हुंडयाची रक्कम वाढत जाते. जिथे प्रत्यक्ष पैसे किंवा वस्तूरुपाने हुंडा घेतला जात नाही तिथेही दोन्हीकडचा खर्च वधुपित्याला करावा लागतो. जिथे पैसा भरपूर असतो तिथे त्याचे प्रदर्शन करण्यासाठी लग्न थाटामाटात केली जातात. त्याची अनुकरणे इतरत्र होत राहतात.

शिकल्या सवरलेल्या मुलींना हुंडा देणे हा स्वत्वाचा अपमान वाटतो. पण बरेच वेळा पुरेशा पाठिंब्या अभावी ती घरच्या दडपणांना बळी पडते.

## नवीन पिढीला काय सल्ला द्यावा ?

आईवडिलांच्या पैशावर जगण्याची बांडगुळी वृत्ती नव्या पिढीत येणे हे समाजाच्या दृष्टीने घातकच आहे. त्यामुळे प्रथम शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभी रहा, स्वाभिमानाने जगायला शिक, वारसा हक्क पदरात पाडून घे, विवाह दोघांचा असल्याने खर्च दोन्ही बाजूने समान उचलला जाईल याची दक्षता घे, असेच तरूण मुलीला शिकवावे लागणार आहे. जून १९९४ पासून महाराष्ट्रातील

सर्व मुलींना पित्याच्या संपत्तीत समान अधिकार मिळाला आहे. हुंडा देऊन वारसा हक्क नाकारण्यापेक्षा स्वावलंबी बनविणे आणि जन्मजात वारसा हक्क मान्य करणे हे स्त्रीचा दर्जा उंचावण्यास मदतकारक होईल.

## हुंडा म्हणजे काय ?

विवाहासाठी कोणतीही अट ठेवून नगद धन किंवा वस्तू घेतल्या गेल्यास साधारणत: हुंडा म्हणतात. हुंडा घेण्या-देण्यावर बंदी घालण्यासाठी कायदा केलेला आहे.

या कायद्यानुसार -

- हुंडा घेणे आणि देणे अपराध आहे.
- हुंडा देण्या-घेण्यात मदत करणेही अपराध आहे.
- हुंडा मागणेही अपराध आहे.

## हुंडा घेतल्यास आणि दिल्यास काय शिक्षा होऊ शकते ?

- पाच वर्षापर्यंत कैद
- पंधरा हजार रूपयांपर्यंत दंड
- हुंड्याची रक्कम जर पंधरा हजार रूपयांपेक्षा जास्त असेल तर त्या रकमेइतका दंड

## हुंडा मागितल्यास काय शिक्षा होऊ शकते?

- कमीतकमी सहा महिने कैद आणि दंड
- हुंड्याची जाहिरात देण्याची शिक्षा
- कमीत कमी सहा महिने कैद आणि एक हजार रूपयापर्यंत दंड. परंतु विवाहाच्या वेळी स्वेच्छेने आणि आर्थिकदृष्टीने वधू किंवा वराला दिलेंली भेट अपराध नाही. परंतु दिलेल्या गोष्टींची यादी करायला हवी. ज्याच्यावर वर आणि वधू दोघांची सही असेल.

## हुंड्यासंबंधी अपराधाची तक्रार कोण करू शकतं?

- एखादा पोलिस अधिकारी
- हुंड्यासाठी छळ होणारी एखादी व्यक्ती
- हुंडयाकरीता छळ होत असलेल्या व्यक्तीचे आईवडिल किंवा नातेवाईक
- नोंदणी कृत असलेली स्वयंसेवी संस्था
- माहिती असल्यास, स्वतः न्यायालय
- हुंडयाची तक्रार लिहिण्यासाठी/दाखल करण्यासाठी वेळेची अट आहे का? नाही.

## हुंड्याच्या संबंधात अपराध म्हणजे काय ?

- संशय आहे. पोलिस स्वतः चौकशी करु शकतात, मॅजिस्ट्रेटच्या आदेशाची गरज नाही. पण कोणालाही अटक करायला मॅजिस्ट्रेटच्या आदेशाची गरज आहे.
- जामीनपात्र नाही. म्हणजे, मॅजिस्ट्रेटच्या आदेशाशिवाय आरोपीला जामीनावार सोडू शकत नाही.
- अक्षमनीय आहे. म्हणजे दंड भरल्याने कुठलाही अपराधी कैदेच्या शिक्षेपासून वाचू शकत नाही.

# बलात्कार *

**स्त्री**ला अवमानित करणारा, तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शरीर संबंध ठेवणारा, सगळयात घृणास्पद गुन्हा म्हणजे बलात्कार. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचारांची सुरुवात अनेकदा छेडछाडीपासून होते. पण त्याचे सगळयात टोकाचे स्वरुप म्हणजे बलात्कार. बलात्कारासाठी अनेक कारणे असतात.

- स्त्रीचा नकार मिळाल्यामुळे चिडून जाऊन केलेला
- कस्टोडियल रेप : हाताखाली काम करणाऱ्या वा संरक्षणासाठी आलेल्या स्त्रीवर केलेला. उदा. पुरुष पालक, हेडमास्तर, मुकादम, सुपरवायझर, पोलिस स्टेशन इ.
- गुप्तरोग बरा होईल या समजुतीतून अल्पवयीन मुलीवर केलेला किंवा एड्सच्या भितीने कुमारिकेवर केलेला.
- मतिमंद किंवा मनोरुग्ण पुरुषाने उत्तेजित होऊन केलेला.
- स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे आणि बलात्कार करण्यात पुरुषार्थ आहे म्हणून केलेला.
- युद्ध वा दंगलीत सूड म्हणून स्त्रियांवर केलेला.
- एखाद्या विशिष्ट जात किंवा समूहाला अद्दल घडविण्यासाठी त्या त्या जातीतील, समूहातील वा विभागातील स्त्रियांवर केलेला.
- लैंगिक वैफल्यामुळे केलेला.

१९८० साली स्त्री चळवळीने मथुरा बलात्कार प्रकरणानंतर दिलेल्या प्रदीर्घ लढयामुळे बलात्कार या विषयावरील बऱ्याच पैलूंवर चर्चा झाली. स्त्रिया छेडछाड वा बलात्काराच्या गुन्ह्याबद्दल तक्रार द्यायला पुढे येऊ इच्छित नाहीत याचे कारण हा एकच गुन्हा असा आहे की ज्यात अपराधी उजळपणाने समाजात वावरु शकतो आणि बळी गेलेली स्त्री मात्र गुन्हा केल्यासारखी तोंड लपवते. बलात्कार हा अपघात समजून विसरता येणार नाही. त्यात शरीराइतके मनावरील आघातही फार खोल असतात. त्यामुळे बलात्कारित स्त्रीचे कुटुंबातील आणि समाजातील पुनर्वसन फारच कठीण होऊन बसते.

यासंबंधिचे महाराष्ट्रातील गेल्या दोन वर्षातील काही गुन्हे पाहता अनेकदा मुलींचा पालकांशी अजिबात संवाद नसतो असे आढळून आले आहे. घराण्याची प्रतिष्ठा या नावाखाली बलात्काराचा गुन्हा दडपून टाकण्याचीही उराहरणे आहेत. त्याचबरोबर बलात्काराच्या एकूण गुन्ह्यांपैकी ७० टक्के बलात्कार हे परिचित किंवा कुटुंबियांनीच केलेले आहेत असे आढळून आले आहे. बलात्काराच्या खटल्यांना मिळणारी सनसनाटी प्रसिद्धी आणि प्रदिर्घ विलंब या दोन्हीमुळेही स्त्रिया तक्रार नोंदविण्यास पुढे येत नाहीत. विशेष न्यायालय, झटपट निकाल आणि पोलिस अधिकारी, न्यायाधीश आणि वकील या तिन्ही भूमिका बजावतांना कायद्याप्रमाणे स्त्री विषयक दृष्टिकोनालाही विशेष महत्त्व देणे आवश्यक आहे. इन-कॅमेरा खटला म्हणजे फक्त विशेष व्यक्तींच्या उपस्थितीतच झालेले. न्यायालयाचे कामकाज झाले तर स्त्रियांना धैर्य प्राप्त होऊ शकते. अर्थात या सर्व बाबतीत बळी पडलेल्या स्त्रीचे मनोगत समजून घेऊन व्यवहार ठरवणे सर्वात महत्वाचे ठरते. जळगाव केसेसमध्ये तसे ठरवूनही खूप अडचणी आल्या आणि काही प्रमाणात यशही मिळाले.

मुलींचे प्रबोधन करणे, त्यांना आत्मविश्वास देणे, लैंगिक शिक्षण देणे आणि स्वसंरक्षण शिकविणे हे बलात्कार टाळण्यासाठी प्रतिबंधक उपाय असले तरी तेवढयाने भागणार नाही. पुरुषांशी, विशेषतः १४ ते १८ वयोगटातील मुलांशी प्रभावी संवाद आणि प्रबोधन हाच यावर प्रभावी उपाय आहे. स्त्री-पुरुष समानतेबरोबर वैयक्तिक आणि सार्वजनिक सभ्य वर्तन, लैंगिक शिक्षण, मुला-मुलींची निकोप मैत्री, मोकळेपणाचे वातावरण याबद्दल त्यांच्याशी बोलणे हेही आवश्यक आहे.

स्त्री ही उपभोगाची वस्तू नाही, तसेच ती कुणाच्या मालकीची वस्तू नाही, तिच्या शरीरावर तिचा अधिकार आहे, तिच्या संमतीशिवाय तिला कोणीही हात लावता कामा नये. परिचय, सहकार्य, सहमती हाच लग्नसंस्थेचा पाया हवा असे नवे संस्कार स्त्री, पुरुष दोघांवरही करायला हवेत.

कलम ३७५ प्रमाणे खालील दर्शविलेल्या कोणत्याही एका परिस्थितीमध्ये पुरुषाने स्त्रीशी केलेला संभोग हा पुरुषाने केलेल्या बलात्काराचा गुन्हा मानला जातो.

अ. तिच्या इच्छेविरुद्ध

ब. तिच्या संमतीविना

क. तिची संमती अथवा तिच्या हितसंबंधीच्या मृत्यूची अथवा इजा करण्याची भीती दाखवून मिळवली असेल.

ड. तिने जर संभोग करणारा पुरुष हा आपला कायदेशीर नघराच आहे असे समजून संमती दिली असेल व ही संमती देताना त्या पुरुषाला माहित असेल की तो तिचा नवरा नाही.

इ. अर्धवट मनस्थितीमुळे अथवा मादक पदार्थाच्या सेवनाने चढलेल्या धुंदीत संमती दिली असेल व ही संमती देताना त्याच्या परिणामाची कल्पना आली नसेल तर.

ई. स्त्रीचे वय १६ वर्षाहून कमी असेल तर तिची संमती असो अथवा नसो.

जोपर्यंत बलात्कार झालेल्या महिलेची डॉक्टरांकडून तपासणी होत नाही तोपर्यंत तिला कपडे बदलू देऊ नयेत किंवा आंघोळ करु देऊ नये.

लक्षात ठेवा; बलात्कार करण्याचा प्रयत्नही अपराध आहे जर एखाद्या स्त्रीने आपल्या शीलच्या रक्षणासाठी पुरुषाचा खुनही केला तरी तिला शिक्षा होऊ शकत नाही. स्त्रियांबरोबर अश्लिल हावभाव आणि हिंसा कायद्याने गुन्हा घोषित केले आहे.

# मानसिक छळ म्हणजे काय ? *

**क**लम ४९८ (अ) जर पतीने अथवा त्याच्या नातेवाईकाने पत्नीचा छळ केला अथवा तिला क्रूरपणाने वागवले तर त्या व्यक्तिला तीन वर्षांपर्यंत शिक्षा व दंड होईल.

लग्न झाल्यापासून जर ७ वर्षांचे आत स्त्रीचा मृत्यू भाजल्यामुळे अथवा तिच्या अंगावरील जखमांमुळे झाला असेल तर तो मृत्यू हुंडाबळीचा मृत्यू म्हणून समजला जाईल व त्यावर पुढची कारवाई होऊ शकेल. अशाप्रकारे स्त्रीचा झालेला अनैसर्गिक मृत्यू हा नवरा अथवा सासरच्यांच्या त्रासामुळे झाला नाही किंवा हुंड्याची मागणी पूर्ण झाली नाही म्हणून दिलेल्या त्रासामुळे झालेला नाही या गोष्टी सिद्ध करण्याची जबाबदारी नवऱ्याची व सासरच्यांची आहे.

४९८(अ) कलमाखाली (मानसिक क्रौर्य) या सदरात विवाहित स्त्रीच्या (सातत्याने आणि पुन:पुन्हा) छळवणुकीच्या तऱ्हा.

१ सातत्याने अन्न देणे नाकारणे

२ विकृत लैंगिक संबंधाची सक्ती करणे

३ शिक्षा म्हणून घराबाहेर उभे करणे

४ मुलांना भेटू देण्यास मज्जाव करुन मानसिक त्रास देणे

५ पुन:पुन्हा मारहाण किवा मारहाणीची धमकी

६ मनस्ताप देण्याच्यां दृष्टीने टोमणे मारणे

७ घरात बंदिस्त करुन समाजात मिसळू न देणे

८ मनस्ताप देण्यासाठी आईसमोर मुलांचा छळ करणे

९ मनस्ताप देण्यासाठी मुलांचे पितृत्व नाकारणे

# अपहरण कशाला म्हणतात. *

एखाद्या अल्पवयीन मुलाला किवा मुलीला त्यांच्या कायद्याने संरक्षक असलेल्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्यापासून दूर नेणे किवा बहकवून नेणे कायद्याने गुन्हा आहे.ह्याला अपहरण म्हणतात. अशा अपराधाला कठोर शिक्षा दिली जाते.

- एखाद्या व्यक्तीला जबरदस्तीने किंवा बहकवून नेणे हा कायद्याने गुन्हा आहे.
- एखाद्या मुलीबरोबर यौन संबंधासाठी तिला पळवून नेणे कायद्याने गुन्हा आहे. यासाठी दहा वर्षे कैद आणि दंड अशी तरतूद आहे.
- एखाद्या व्यक्तीला जबरदस्तीने आपल्या कब्ज्यात ठेवणे हा कायद्याने गुन्हा आहे,ज्याची शिक्षा तीन वर्षे कैद आणि दंड आहे.
- जर कोणी मुलाला बहकवून नेले किंवा मूल स्वेच्छेने त्याच्या बरोबर गेले, तरीही हा कायद्याने गुन्हाच होणार.

# बालकांवरील अत्याचार म्हणजे काय ? *

कुठल्याही समाजाची सुसंस्कृतता ही त्या समाजातील मुलांच्या स्थितीवर ठरविली जाते.

आशियातील हजारो मुलं आज बालशोषणाची बळी ठरत आहेत. अर्थात यात मुलींचे प्रमाण बरेच जास्त आहे. जगणे, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि मुख्य म्हणजे प्रेम हे मुलांचे मूलभूत हक्क आहेत. पण आजही शेकडो मुले या जगण्याला वंचित आहेत. शारीरिक, मानसिक, लैंगिक अत्याचारांची बळी ठरत आहेत.

**शारीरिक** - काम करुण घेणे, मारहाण, चटके देणे, अन्न न देणे

**भावनिक** - धमकी देणे, घाबरविणे, ब्लॅकमेलिंग करणे

**लैंगिक** - विनयभंग, बलात्कार, लैंगिक विकृती, वेश्याव्यवसायास भाग पाडणे.

भारतात साधारण पाच कोटींच्यावर मुलं ही बालकामगार आहेत. या मुलांचा वयोगट आहे ८ ते १४. एकट्या बिहारमधील (कारपेट) गालिचे बनविण्याच्या उद्योगात ३ लाख बालके काम करतात. यातील बरीच मुले वेठबिगारांसारखी अर्धपोटी, फारसे वेतन न देताच राबविली जातात. याशिवाय तामीळनाडू मधील फटाक्यांचे कारखाने, काड्यापेट्यांचे कारखाने, इतरत्र काचकारखाने, हॉटेल उद्योग, शेती, चर्मोद्योग, बांगड्यांचे कारखाने, हिऱ्यांना पैलू पाडणे, दगड खाणी, कचरा गोळा करणे, हातमाग अशा अनेक क्षेत्रात छोटी छोटी मुले आणि मुली राबताना दिसतात.

याहीपेक्षा भयंकर गोष्ट म्हणजे लहान मुलींना वेश्या व्यवसायात ढकलणे आणि छोट्या मुलांचा विकृत लैंगिक संबंधासाठी वापर यल्लम्माच्या जत्रेत अंधश्रद्धेच्या प्रभावाखाली सौदत्तीला शेकडो दलित व गरीब कुटुंबातील मुलींनाच देवदासी केले जाते. मुंबईहून तिथे गेलेले दलाल या मुलींना लगोलग मुंबईला नेऊन वेश्या व्यवसायात लोटतात. नेपाळकडून शेकडो मुली फसवून / कामाचे आमीष दाखवून / विकत घेऊन मुंबईत आणल्या जातात. गेल्या २/३ वर्षात एड्सच्या भीतीने छोट्या मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. गोव्यातील छोट्या मुलग्यांचा

अनाथाश्रम चालविणारा फादर फेडी पिटस् याने शेकडो मुलांचा विकृत अनैतिक कामासाठी उपयोग केला. काही जैन साधू आणि गुजरातमधील एक स्वामीमहाराज यांचीही अशीच प्रकरणे नुकतीच उजेडात आली आहेत.

सर्व मुलांना शिक्षण सक्तीचे करणे, बालिकांच्या व्यापारावर कडक नियंत्रण ठेवणे, शाळेतून मुलांची गळती होत असल्यास ताबडतोब त्याचा शोध घेणे, मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे, चोरुन बालकामगार ठेवणाऱ्या उद्योगांवर कडक नियंत्रण ठेवणे, अर्थात या सर्वांबरोबर या बालकांच्या तसेच त्यांच्या पालकांच्या उदरनिर्वाहाची सोय होणेही आवश्यक आहे. दारिद्रय निर्मूलनाचे काम जितक्या प्रभावीपणे होईल तितके बालमजुरीचे प्रमाण कमी होईल हे लक्षात ठेवायला हवे. याबरोबरच बालिकांचा व्यापार करणे आणि मुलांचा लैंगिक विकृतीसाठी उपयोग यासाठी कडक शिक्षा आणि कारवाई हवी. देवदासी प्रथेविरुद्ध प्रबोधन तसेच वेश्यांच्या मुलांचे पुनर्वसन, त्यांच्यासाठी शिक्षणाची, वसतीगृहाची, रात्र पाळणाघराची सोय करुन ती मुले पुन्हा त्या व्यवसायात ओढली जाणार नाहीत याची दक्षता ध्यायला हवी. वाढत्या शहरीकरणाबरोबरच गुन्हेगारी वाढते आहे. आणि त्यात छोट्या मुलांचा उपयोग करून घेतला जात आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी अनेक सेवाभावी संस्था काम करीत आहेत. त्यांचे हात बळकट करायला हवेत.

# सुधारित माहेर योजना

**शासन निर्णय क्रमांक /१०९४/४७१/का-२ / दि. २९.८.९४**

निराधार, निराश्रित, परित्यक्ता अशा महिलांना तात्पुरता आधार देऊन त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करण्यासाठी शासनामार्फत राज्यगृहे, आधार गृहे व संरक्षणगृहे या योजना राबविल्या जातात. या संस्थातील लाभधारकांना अन्न, वस्त्र व निवारा यांची तात्पुरती सुविधा पुरविण्यात येते व त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करण्यात येतो. सुधारित माहेर योजनेमार्फत प्रत्येक लाभधारकास स्वाभिमानाने तिच्या आयुष्याची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करण्याच्या दृष्टीने वर नमूद केलेल्या संस्थेत येणाऱ्या लाभधारकास एक वर्षापुरते दरमहा रु. २५०/- अनुदान मंजूर करण्यात येत आहे. लाभधारकास मुले असल्यास पहिल्या मुलाकरिता दरमहा रु. १५०/- व दुसऱ्या मुलाकरिता दरमहा रु.१००/-असे अनुदान अनुज्ञेय राहील लाभधारकाच्या संस्थेतील वास्तव्याच्या कालावधीनुसार अनुदानाच्या रकमेची पूर्तता वेगवेगळया पद्धतीने होईल व हा आदेश तत्काळ अंमलात येईल. अंमलबजावणी महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात यावी.

# देवदासी पुनर्वसन योजना *

**शासन निर्णय क्रमांक : १०९३/प्र. क्र. ३९६ /का.२/दि. २९.८.९४**

देवदासी कल्याण अभ्यास गटाने देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी व देवदासीच्या पुनर्वसनासाठी सादर केलेल्या अहवालातील शिफारसींवर शासन पुढील निर्णय देत आहे.

देवदासींना स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी बीजभांडवल योजना चालू करणे, याबाबत सज्ञान अर्जदाराने देवदासी व महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचा दाखला व अपेक्षित व्यवसायाला बँकेच्या कर्जाची मंजुरी याची पूर्तता केल्यास बँकेसाठीचे २५ टक्के हे बीज भांडवल शासनातर्फे बँकेत भरण्यात येईल. या रकमेची परतफेड लाभधारकाने द.सा.द.शे. रु. ४/- इतक्या दराने करावी व बँकेची कर्जफेड बँकच्या प्रचलित नियमानुसार करावी.

देवदासींच्या मुलामुलींना शिक्षणासाठी मदत होण्यासाठी त्यांना गणवेशाचे दोन संच व लेखन साहित्य शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत शासनामार्फत पुरविण्यास व वाहन खर्चासाठी रु. २० ते ३० दरमहा राज्य परिवहन मंडळाच्या बसेसच्या पासाच्या स्वरुपात उपलब्ध करून देणे; देवदासींच्या इ. पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित ही योजना जिल्हा परिषदांमधील महिला व बालकल्याण समितीमार्फत राबविण्यात यावी.

# सुधार प्रशासन अंतर्गत अनुदान संस्था दरडोई अनुदानात वाढ

सुधार प्रशासन अंतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्था दरडोई अनुदानात वाढ करणेबाबत **शासन निर्णय क्रमांक जे. जे. ए - १०९४ /प्र.क्र. ४०/का -३ /दि. १५-१२-९४.**

सुधार प्रशासन अंतर्गत चालविण्यात येत असलेल्या महिला व बालकल्याण क्षेत्रातील संस्थामधील लाभधारकांना सध्या देण्यात येणारे दरडोई रु. २५०/- इतके परिरक्षण अनुदान टाळवून आता ही रक्कम दरडोई रु ४५०/-करण्यास

शासन मंजुरी देत आहे व १ एप्रिल १९९४ पासून ही वाढ अंमलात येईल. याबाबतचा आदेश अंमलबजावणी संचालक, महिला व बाल कल्याण संचालनालय, म.रा. पुणे यांच्या अखत्यारीत आहे.

देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी सामाजिक प्रबोधनाचे कार्य प्रभावीपणे करणाऱ्या एकूण ३० संस्थांना रु. १०,०००/-इतके प्रोत्साहन अनुदान देण्यात येईल.

या योजनेसाठी देवदासी कल्याण अभ्यास गटाने देवदासींचे प्राबल्य असलेले कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, पुणे व मुंबई हे दहा जिल्हे नमूद केले असून प्रत्येक जिल्ह्यात ३ संस्था अनुदानास पात्र असतील. या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी संस्थेने पूर्वी देवदासी प्रथा निर्मुलनासाठी किमान ३ वर्षे सातत्याने भरीव स्वरूपाचे कार्य केलेले असावे. अर्जाच्या तारखेपूर्वी किमान ३ वर्षे आधी संस्थेची नोंदणी झालेली असावी. सदरहू अनुदान संचालक महिला व बाल कल्याण, महाराष्ट्र राज्य यांचेतर्फे मंजूर करण्यात येईल.

## विधवा महिलेच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान

अनाथ, निराश्रित विधवा महिलांना तिच्या एका मुलीच्या विवाहासाठी रु.२०००/- इतके अनुदान देण्यात येते.

## शासकीय महिला स्वीकार केंद्रातील मुलींच्या विवाहासाठी अनुदान

शासकीय महिला स्वीकार केंद्र, संरक्षण गृह यामधील मुलींच्या विवाहासाठी रु. १०००/-इतके अनुदान देण्यात येते.

# स्त्रियांना नवऱ्याच्या संमतीशिवाय गर्भपात करुन घेण्याचा अधिकार आहे का ? *

कुटुंबनियोजन साधनांचा शोध हे आधुनिक स्त्रीला मिळालेले वरदानच आहे. याचबरोबर नको असलेली संतति टाळण्यासाठी आपल्या देशात १९७१ साली एक महत्त्वाचा कायदा केला गेला तो म्हणजे **गर्भपाताचा कायदा.** जगामधील अनेक देशातील स्त्रिया आजही गर्भपाताच्या हक्कासाठी लढत असल्याने आपल्याकडील कायद्याचे महत्व लक्षात येईल. गर्भपात हे कुटुंबनियोजनाचे साधन नाही. विशिष्ट परिस्थितीत एखादी लादलेली गोष्ट टाळण्यासाठी तो एक मार्ग आहे. कुटुंबनियोजनाची साधने वापरून संतति टाळणं हेच खरं तर योग्य आहे. प्रत्येक गर्भपातात स्त्री शरीरास थोडी फार इजा पोचत असल्याने या कायद्याचा वापर जरा जपूनच करायला हवा. तसेच कुठल्यातरी वैदू किंवा अप्रशिक्षित व्यक्तीऐवजी वैद्यकीय सल्ल्यानुसार गर्भपात करुन घ्यावा.

मुलगा हवा म्हणून मुलींचे गर्भ पाडले जातात. यावर उपाय काय ?

## गर्भलिंग चिकित्सा विरोधी कायद्यातील तरतूदी

- गर्भजलपरीक्षा, सीव्हीबी अशा कोणत्याही तंत्राचा वापर केवळ मुलगा की मुलगी ओळखण्यासाठी करणे हा कायद्याने गुन्हा आहे.
- वरील तंत्राचा उपयोग केवळ गर्भातील अनुवंशिक विकृतींचा छडा लावण्यासाठी करण्यात येईल.
- असा योग्य उपयोग केवळ पात्र व अनुभवी तज्ञ व्यक्ती विशिष्ट ठिकाणीच करु शकतील. त्यासाठी अशा व्यक्तींना व जिथे हा तंत्राचा उपयोग करायचा अशा केंद्रांना /प्रयोगशाळांना लायसेन्स घ्यावे लागेल. लायसेन्स देण्यासाठी व ह्या प्रश्नावरील धोरण ठरविण्यासाठी शासन खास समिती नियुक्त करेल. त्यात सरकारी अधिकारी, डॉक्टर्स व स्वयंसेवी संघटनांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल.
- सरकारी व खाजगी - दोन्ही क्षेत्रातील व्यक्ती/संस्थाना लायसेन्स मिळू शकेल.
- गर्भात अनुवंशिक विकृती असण्याची शक्यता कशी ओळखणार ह्यासाठी काही निकष तयार केलेले आहेत. त्यानुसार केवळ खालील परिस्थितीतच गरोदर

बाईला ह्या तंत्रांचा उपयोग करण्यासाठी लायसेन्सधारी केंद्र/प्रयोगशाळांकडे जाता येईल.

अ. गरोदर बाईचे वय ३५ वर्षे वा त्याहून अधिक असल्यास.

आ. तिचा ह्यापुर्वी दोन किवा अधिक वेळेस नैसर्गिकरीत्या गर्भपात झाला असल्यास.

इ. गर्भावर विपरीत परिणाम करू शकेल असे औषध /किरण /रसायन /रोगजंतू शरीरात गेल्यास.

ई. कुटुंबात ह्यापूर्वी कुणा व्यक्तीत अनुवंशिक विकृती असल्यास.

ए. ह्याव्यतिरिक्त सरकार नियुक्त मंडळाने सुचविल्यास.

- लायसेन्स मिळालेल्या केंद्राला /प्रयोगशाळेला त्यांनी केलेल्या सर्व टेस्टची कागद्पत्रे तीन वर्षापर्यंत जपून ठेवावी लागतील.
- सरकार राज्य व स्थानिक पातळीवर दक्षता समित्या नेमेल. अनधिकृत केंद्र / प्रयोगशाळांना आळा घालणे व लायसेन्स मिळालेल्या केंद्रात /प्रयोगशाळांमध्ये टेस्ट्सचा गैरवापर होऊ नये ह्यावर दक्षता समित्या लक्ष ठेवतील. ह्यासाठी दक्षता समित्यांना आवश्यक अधिकारही देण्यात आले आहेत. उदा. झडती घेणे, कागदपत्र जप्त करणे, लायसेन्स रद्द करणे इ. ह्या देखरेख समित्यांमध्ये सरकारी अधिकारी, डॉक्टर्स व सामजिक संघटनांचे प्रतिनिधी असतील.

मुलगा हवा म्हणून गर्भ चिकित्सा करून लिंग जाणून घेऊन, मुलगी असल्यास गर्भ पाडण्याची प्रवृत्ती थांबावी म्हणून हा कायदा केलेला आहे.

या कायद्याप्रमाणे गर्भपात करता येतो,

- जर मूल वाचविल्याने आईच्या जीवाला धोका असेल तर.
- आईच्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यास धोका असेल तर.
- विकलांग मूल जन्माला येत असल्यास.
- स्त्री क़िवा पुरुषाने वापरलेल्या कुटुंब नियोजन पद्धतीत असफलता आल्यास.
- स्त्रीची मानसिक अवस्था किवा भोवतालचे वातावरण यामुळे तिच्या आरोग्याला धोका असल्यास.

बारा आठवड्याच्या गर्भाचा एका डॉक्टरच्या सल्लाने, बारा आठवड्यातून जास्त वाढलेल्या गर्भाचा दोन डॉक्टरांच्या सल्ल्याने गर्भपात केला जाऊ शकतो. परंतु वीस आठवड्यापेक्षा जास्त गर्भाचा गर्भपात करता येणार नाही.

# दारुची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावर उपाय काय? *

**कौ**टुंबिक समस्यांचे विश्लेषण केल्यावर असे लक्षात येते की जवळजवळ निम्म्या समस्या या व्यसनग्रस्त नवऱ्यांमुळे निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्रात आज ४५०० कोटी रुपयांची दारु अधिकृत वा अनधिकृतरीत्या विकली जाते. याचाच अर्थ प्रत्येक कुटुंबामागे सरासरी २५०० रु. दारुवर वार्षिक खर्च होतो. दर आठ घरांमध्ये एक पुरुष व्यसनग्रस्त आहे. गरीब आणि श्रीमंत सर्वांनाच दारुचा विळखा पडला आहे. आज दारुचा अड्डा नाही अशी एकही झोपडपट्टी मिळणार नाही आणि जवळजवळ निम्म्या हॉटेल्समध्ये परमिट रुम्स आहेतच आणि त्याचबरोबर येणाऱ्या डिस्को, फ्लोअर डान्स, स्त्री सेविका इ. गोष्टीही वाढत आहेत.

महाराष्ट्रात दारुविरुद्ध पहिला आवाज उठवला धुळ्यामधील शहाद्याच्या आदिवासी स्त्रियांनी. शेतकरी संघटनेतही स्त्रियांना दारुच्या प्रश्नावर जागृत केले. पण हे दारुमुक्ती आंदोलन पध्दतशीरपणे उभे केले गडचिरोली व आदिवासी जिल्ह्याने. १९७४ मध्ये इंदिरा गांधींनी आदिवासींसाठी दारु नीती धोरण आणले होते. ते स्वीकारने त्यांनी सरकारला भाग पाडले. गावागावातून स्त्री-पुरुषांनी दारुला विरोध केला. परिणामी १९९३ मध्ये सरकारला गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी करावी लागली. गेल्या दोन तीन वर्षात तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक, ओरिसा, हिमाचल प्रदेश या राज्यात स्त्रियांनी दारुविरोधी प्रखर आंदोलन सुरु केले. महाराष्ट्रातही अनेक गावात दारुविरुद्ध उठाव होत आहेत. पिंपळगाव हे स्त्रियांच्या संघटित प्रयत्नांचे अलिकडचे उदाहरण.

याच्याच परिणामी ग्रामसभेतील ५० टक्के सदस्यांनी ठराव केल्यास गावातील दारुचे दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला जावा असे महिला धोरणात ठरविले गेले आहे.

धोरणातील या आदेशाची अंमलबजावणी केवळ गावापुरतीच मर्यादित न राहता हा निर्णय नगरपालिका आणि नगरपरिषद क्षेत्रातही लागू करण्यात आला आहे. एखाद्या वॉर्डमधील ५० टक्के मतदारांनी जर दारुचे दुकान बंद करण्याची मागणी केली तर ते बंद करावे लागेल असा हा आदेश आहे. नगसेवकांनी जर लक्ष

घालून यासंबंधी प्रचार केला तर आपापल्या विभागातील दुकाने बंद करुन त्या अनेक कुटुंबाचा दुवा मिळवू शकतील.

दारुप्रमाणे, तंबाखू, मिसरी, गुटखा आणि अलिकडच्या काळात शहरातून जास्त वाढत चाललेली ड्रग्जची नशा तरुण पिढीला व्यसनाच्या विळख्यात ओढीत आहे. या सर्वाविरुध्द प्रतिबंधक उपाययोजना आवश्यक आहे. माध्यमांच्या उपयोगातून व्यसनातून होणारी शरीराची हानी आणि मानसिक हानी तरुणांना समाजावून सांगणे, व्यसन मुक्तीची केंद्रे निर्माण करणे, नशेचे आकर्षण कमी होईल अशाप्रकारे वेगळे कार्यक्रम आखणे, ड्रग्जसारख्या व्यसनांची भयानकता त्यांना समजावून सांगणे, त्याबद्दलच्या कडक शिक्षेची जाणीव देणे, असा मोठा कार्यक्रम शासनाबरोबरच स्वयंसेवी संघटनांनी हाती घेणे आवश्यक आहे.

## दारुच्या दुकानाविरुद्ध तक्रार करायची असल्यास कोणाकडे करता येईल?

देशी दारु दुकान विरुद्ध तक्रारीसंदर्भात ग्रामीण भाग, नगरपरिषद तसेच महानगरपालिका क्षेत्राकरिता **शासन निर्णय क्रमांक बी पी अे - १२९३/२२९/इअेक्स सी-३ दि. १४-७-९३, ११-१०-९३, २९-१२-९३, ३०-७-९४**.

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील देशी दारु दुकानांच्या आलेल्या तक्रारीसंदर्भात मार्गदर्शक सूचनांतील कार्यवाहीला अनुसरुन आता पुढील आदेशानुसार संबंधीत गावातील ५० टक्के महिला मतदारांनी उपस्थित राहून दारु दुकाने बंद करण्याची मागणी केल्यास अथवा ग्रामसंस्थेतील ५० टक्के मतदारांनी ही मागणी केल्यास सदर दुकानाची अनुमती तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही करावी.

तसेच नगर परिषद /महानगरपालिका हद्दीतील संबंधित वॉर्डातील ५० टक्के महिला मतदारांनी दारु दुकानं बंद करण्याची बैठक घेऊन ठरावसंबंधीत मागणी केल्यास दुकान बंद कदण्यात यावीत.

# विवाहविषयक कायदे *

**वि**वाह कायदा हा प्रत्येक धर्माच्या, जाती समाजाच्या रीतीरिवाजांशी व धार्मिक कल्पनांशी निगडीत असा असून हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान, पार्शी व इतर वेगवेगळ्या समाजासाठी वेगवेगळा कायदा अस्तित्वात आहे.

१९५६ साली हिंदू विवाह कायदा अस्तित्वात आला. हिंदू कायदा हा हिंदू धर्म मानणाऱ्या व्यक्तीस लागू आहे. वीरशैव, बौद्ध, जैन, शीख, ब्रह्म, प्रार्थना व आर्य समाजी ह्या अनुयायींना लागू आहे. ज्या हिंदूचे विवाह स्पेशल मॅरेज ॲक्टनुसार केले जात नाहीत त्या सर्वांना हा कायदा लागू होतो.

## विवाह कायद्यांतर्गत व्यक्ती कोणाकोणाशी विवाह करु शकते?

१. वर व वधू एकतर अविवाहित, विधवा वा विधुर असावेत.

२. वर व वधू कायद्याने अमान्य असणाऱ्या नात्यातील व सपिंडी नसावेत

या अटींची पूर्तता केल्याशिवाय विवाह कायदेशीर ठरत नाही. परंतु विवाह बेकायदेशीर ठरण्याकरता दुसऱ्या पक्षाने तक्रार करावी लागते.

१. वधू १८ वर्षे पूर्ण, वर २१ वर्षे पूर्ण वयाचा असावा. वधू १७ वर्षाखालील असल्यास तिच्या पालकांची संमती आवश्यक आहे.

२. मानसिक विकृती, वेड, फेफरे यासारखे रोग नसावेत.

३. एकमेकांचे सपिंडी असू नये म्हणजे आईकडून पणज्याच्या पिढीपर्यंत (म्हणजे तिसरी पिढी) व पित्याकडून पाचव्या पिढीत पोहोचणारा संबंध नसावा.

४. समाजरुढ चालीरीतींकडून मान्यता व सहमती आवश्यक आहे.

५. विवाह नोंदणी न केल्यास विवाह बेकायदेशीरपणे ठरत नाही पण वधूवर दंडास पात्र ठरतात.

## बेकायदेशीर विवाहाचे बाबतीत काय करता येईल ?

विवाह गैरकायदेशीर असेल तर खालील पद्धतीचे कायदेशीर उपाय उपलब्ध आहेत.

१. विवाह गैरकायदेशीर असल्याचा न्यायालयाद्वारा आदेश मिळवणे.

२. प्रतिपक्षाने संसार करण्याची मागणी करणे.

३. विभक्त राहण्याची मागणी करणे.

४. घटस्फोट

५. पोटगी

## न्यायालय खालील कारणाकरिता विवाह गैरकायदेशीर ठरवते

१. नपुंसकत्व असणे

२. मानसिक विकृतीमुळे सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास अपात्र असणे.

३. वेड, फेफरे यासारखे रोग असणे.

४. जबरदस्तीने व फसवणूक करून लग्नास संमती देणे.

उत्पन्न व सामाजिक प्रतिष्ठा याबाबत फसवणूक होऊ शकत नाही. विवाह रद्द करवून घेण्याकरिता व्यक्तीने विवाह झाल्यापासून एक वर्षाच्या आत कोर्टात अर्ज करावा लागतो.

१. ज्या कारणास्तव विवाह रद्द करावयाचा आहे ते कारण विवाहाच्या वेळी माहित नसणे.

२. कारण माहित झाल्यानंतर दोघात संभोग झालेला नसणे.

३. विवाह रद्द होण्यापर्यंतच्या काळात जन्म झालेले मूल कायदेशीर ठरते. परंतू अशा मुलाला इस्टेटीवर हक्क मिळत नाही.

# वैवाहिक तक्रारी व उपाय

सहवासाची पुन:स्थापना - अर्जदाराचा परित्याग पुरेशा कारणाशिवाय केला आहे असे आढळून आल्यास दुसऱ्या पक्षास अर्जदाराबरोबर संसार करण्याचा आदेश देऊ शकते. ह्या आदेशास घटस्फोट मिळविणाच्या दृष्टीने महत्त्व आहे. एक वर्षाच्या आत आदेशाचे पालन झाले नाही तर घटस्फोट मिळविण्यास हे कारण ठरते.

# हिंदू विवाह अधिनियम १९५५

हिंदू कोण ?

हिंदू, मग तो कोणत्याही जाती संप्रदायाचा असो.

बौद्ध, जैन, शीख

कोणतीही अशी व्यक्ती जिने आपला मूळ धर्म सोडून हिंदू धर्म स्वीकारला आहे. सर्वसाधारपणे अनुसुचित जनजातींना हा कायदा लागू होत नाही.

# हिंदू विवाहाचा विधी

हिंदू विवाह वधू आणि वर यामध्ये समाजात प्रचलित रीती-रिवाजांप्रमाणे झाला पाहिजे.

सर्व साधारणपणे हिंदू विवाह होम, यज्ञ, हवन आणि सप्तपदी द्वारा केला जातो.

# हिंदू विवाहासाठी

- वधू आणि वर दोघांनी हिंदू असणे आवश्यक आहे.
- वधू आणि वर यांचे या आधी लग्न झालेले नसावे. म्हणजे लग्नाच्या वेळी वराची जिवंत बायको किंवा वधूचा जिवंत नवरा असायला नको
- वर आणि कन्या एकमेकांचे जवळचे नातेवाईक नसावेत.
- वर आणि कन्या मानसिक दृष्ट्या निरोगी असायला हवेत.
- मुलाचे वय एकवीस वर्षे पूर्ण तर मुलींचे वय अठरा वर्षे पूर्ण असायला हवे. त्याहून कमी वयाचा मुलगा किंवा मुलगी ह्यांचे लग्न करणे कायद्याने गुन्हा आहे. परंतु असे लग्न बेकायदेशीर मानले जाणार नाही.

## काही कारणांमुळे लग्न / विवाह रद्द करता येऊ शकतो.

- पतींच्या नामर्दपणामुळे लग्न पूर्ण झाले नाही म्हणून.
- लग्न फसवून किंवा दबावाखाली केले असेल तर

## दुसरे लग्न - कायद्याने गुन्हा

### कायदा म्हणतो की

- बायको जिवंत असताना दुसरे लग्न करणे कायद्याने गुन्हा आहे. पहिली बायको वाटल्यास नवऱ्या विरुद्ध पोलिस ठाण्यात किंवा मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात तक्रार नोंदवू शकते. अशा नवऱ्याला सात वर्षासाठी कैद अशी शिक्षा होऊ शकते.
- असे दुसरे लग्न कायदेशीर लग्न मानले जात नाही.
- पत्नीच्या संमतीने केलेले दुसरे लग्न ही बेकायदेशीरच आहे.
- दुसऱ्या पत्नीला प्रत्यक्षात पत्नीचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत. तिला खर्च मागता येणार नाही किंवा पतीच्या संपत्तीत कोणताही अधिकार मिळणार नाही.
- जर पाहिल्या बायकोचे अस्तित्व दुसऱ्या बायकोपासून लपवून ठेवले तर, दुसरी बायको नवऱ्याविरुद्ध फसवणुकीचा दावा लावू शकते. नवऱ्याकडून पोटगी घेण्यासाठी दावा लावू शकते.
- दुसऱ्या लग्नापासून झालेल्या मुलांना वडिलांच्या संपत्तीत एखाद्या औरस मुलाला मिळाले असते तसेच सगळे हक्क मिळतील.

## बालविवाह - कायद्याने गुन्हा

एकवीस वर्षापेक्षा कमी वय असलेला मुलगा आणि अठरा वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलीचा विवाह ह्याला बालविवाह म्हणतात. असे करणे कायद्याने गुन्हा आहे.

## हिंदू विवाह कायदा म्हणतो की -

एकवीस वर्षाखालील मुलगा आणि अठरा वर्षाखालील मुलीने जर स्वेच्छेने लग्न केले तर त्यांना -

- १५ दिवस कैद
- १०० रुपयापर्यंत दंड
- किवा तुरुंगवास आणि दंड दोन्ही होऊ शकते (धारा १८, कलम - ३)

## बालविवाह विरोधी १९२९, १९८६ एक कायदा म्हणतो की-

१८ वर्षावरील पण २१ वर्षापेक्षा कमी वय असलेला मुलगा आणि १८ वर्षाखालील मुलीशी लग्न करतो, त्याला

- १५ दिवस कैद
- १०० रुपयापर्यंत दंड किंवा
- किवा कैद आणि दंड दोन्ही होऊ शकते (कलम ३)

२१ वर्षावरील मुलाने जर १८ वर्षाखालील मुलीशी लग्न केले तर त्याला

- ३ महिन्यापर्यंत कैदेची शिक्षा
- दंडही होऊ शकतो (कलम ४)

बालविवाह घडवून आणणाऱ्यांना (आई-वडील,नातेवाईक, लग्न लावणारे भटजी इ.) यांना

- ३ महिन्यापर्यंत कैद आणि दंड होऊ शकतो.

कोणत्याही स्त्रीस (आई, पालक इ.) या गुन्ह्यासाठी अटक करता येत नाही, फक्त दंड भरावा लागेल.

## बालविवाहाची तक्रार कशी करता येईल

ज्या व्यक्तीचा बालविवाह होत असेल त्या व्यक्तीची कोणत्याही नातेवाईक, मित्र किवा आप्त बालविवाहासंबंधी पोलिस स्टेशनवर जाऊन संपूर्ण माहिती देऊ शकते.

या तक्रारीची चौकशी करुन पोलिस मॅजिस्ट्रेटकडे रिपोर्ट पाठवतील. ही केस मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात चालेल आणि बालविवाह सिद्ध झाल्यास अपराधी व्यक्तींना शिक्षा होऊ शकेल.

बालविवाह करणाऱ्यास किंवा घडवून आणणाऱ्यास तीन महिन्यापर्यंत कैद किंवा १००० रु. (एक हजार रूपये) पर्यंत दंड होऊ शकतो.

## बालविवाह थांबवता येतो का ?

होय, पुरेसा अवधि असेल, बालविवाह होणाऱ्या व्यक्तीने स्वतः तक्रार नोंदविली असेल किंवा त्या व्यक्तीच्या नातेवाईक, मित्रांकडून मॅजिस्ट्रेटकडे तक्रार नोंदविली गेली असेल तर आदेश मिळताच पोलिसांना विवाह थांबविण्याची कार्यवाही करावी लागेल आणि आरोपीला शिक्षा किंवा दंड होण्यासाठी केस नोंदवता येईल.

## विवाहाची नोंदणी करणे सक्तीचे आहे का?

आज तरी विवाहाची नोंदणी करणे सक्तीचे नाही पण अशी नोंदणी केल्यास त्याचे अनेक फायदे आहेत. अशी नोंदणी लग्न झाल्यावरही करता येते. मात्र त्यासाठी वधूवरांचे फोटो, समक्ष हजेरी, पुरोहिताची सही आणि दोन साक्षीदार इतक्या गोष्टी लागतात.

## अशी नोंदणी कुठे करता येते ?

१) ग्रामपंचायत

२) तालुका वा जिल्ह्याच्या ठिकाणी विवाह अधिकारी

# पोटगीचा कायदा *

**क**लम १८ (२) प्रमाणे हिंदू पत्नीला पतीपासून वेगळे राहून पोटगी मागण्याचा हक्क खालील कारणांसाठी दिला आहे.

१. कोणत्याही योग्य कारणाशिवाय नवऱ्याने पत्नीला तिच्या संमतीशिवाय आणि इच्छेविरुद्ध टाकून दिले असेल तर.

२. नवरा जर पत्नीला क्रूरपणाने वागवत असेल तर ह्यात शारीरिक मानसिक क्रूरता दोन्हीचाही समावेश होतो.

३. नवरा जर महारोगाने ग्रासलेला असेल तर

४. नवऱ्याची दुसरी पत्नी जर हयात असेल तर हा हक्क दोन्ही पत्नींना दिलेला आहे.

५. पतीचे लग्नबाह्य संबंध असल्यास

६. पतीने जर धर्मांतर केले तर.

७. ह्याशिवाय इतर योग्य कारणांसाठी हिंदू पत्नीचा हा हक्क·कलम १८ (३) प्रमाणे जर तिने धर्मांतर केले किंवा ती व्यभिचारी जीवन जगू लागली तर संपुष्टात येतो .

पत्नीच्या पोटगीच्या हक्काची तरतूद आज अस्तित्वात असणाऱ्या सर्व व्यक्तिगत वैवाहिक कायद्यांमध्ये केलेली आहे. विवाह कायद्याखाली दोन प्रकारची पोटगी मिळू शकते. एक म्हणजे अंतरिम व दुसरी कायमची. दावा चालू असतानाच्या काळाकरिता मिळणाऱ्या पोटगीला अंतरिम पोटगी म्हणतात व दाव्याचा अंतिम निकाल लागल्यानंतर मिळणाऱ्या पोटगीला कायमची पोटगी म्हणतात.

हिंदू विवाह कायदा, पारशी विवाह व घटस्फोट कायदा, भारतीय घटस्फोट कायदा, या कायद्याखालील पोटगीचे दावे चावविण्याचे अधिकार पुढे सांगितलेल्या ठिकाणच्या न्यायालयांना असतात.

१. ज्या गावी विवाह साजरा झाला असेल किंवा

२. ज्या गावी पती-पत्नी शेवटी एकत्र राहिले असतील किंवा

३. ज्या गावी पती रहात असेल त्या ठिकाणी.

## पोटगी (भरण-पोषण) ची व्यवस्था कशी करायची ?

घटस्फोट देणारे न्यायालय पतीने पत्नीला किती पोटगी द्यावी याचा आदेश देईल.

## कलम १२५ - पोटगी

कलम १२५ प्रमाणे जर एखादा पती स्वतःची ऐपत असूनही बायकोस पोसण्याची जबाबदारी नाकारत असेल किंवा तिला अन्न-वस्त्र देण्याबाबत हयगय करत असेल तर अशा पतीकडून पोटगी मागता येते.

या कलमाखाली आता १५०० रुपयाची दरमहा मर्यादा कायद्याने घातली आहे. कलम १२५ ही फौजदारी कायद्यातील तरतूद आहे. हा कायदा सर्व भारतीयांना लागू आहे.

## पोटगी किती आणि कोणत्या हिशोबाने दिली जाते ?

स्त्री आपल्या गरजा स्वतः पूर्ण करण्यास असमर्थ असल्यास

पुरुषाचा पगार किंवा जमीन -जुमला किती आहे ?

स्त्रीच्या गरजा काय आहेत ?

## ही पोटगी कधीपर्यंत मिळते?

- पोटगी घेणारी व्यक्ती जिवंत असेपर्यंत
- दुसरा विवाह करेपर्यंत

## मुलांचा ताबा कोणाला मिळेल ?

आईवडिल जर हयात नसतील किंवा आईवडिलांचा घटस्फोट झाला तर मुलांचे संगोपन कोण करेल हे ठरविण्यासाठी गार्डियन ॲण्ड वार्डस ॲक्ट या नावाने एक कायदा केलेला आहे.

## घटस्फोटानंतर मुलांचे काय?

- मुल जर लहान असेल तर सात वर्षाचे होईपर्यंत ते मूल तिच्याकडे ठेवण्याचा कायद्याने अधिकार आहे.
- पाच वर्षांवरील मूल कोणाकडे राहील या गोष्टीचा निर्णय, न्यायालय मुलाचे हित लक्षात ठेवून करेल.
- मुलाचे हित जर आईकडे राहण्यात असेल तर मूल आईला दिले जाईल. अशा परिस्थितीत मूल जरी वडिलांकडे रहात नसले तरी वडिलांना त्याचा खर्च द्यावा लागेल.
- अल्पवयीन मुलाच्या शरीराचे व त्याच्या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी न्यायालय प्रतिपालक नेमू शकते. जो न्यायालयास उत्तर द्यायला बांधिल राहील.

## एखाद्या स्त्रीला वाटले तर ती संपत्ती विकू शकते का?

होय एखाद्या स्त्रीला वाटले तर ती संपत्ती विकू शकते किवा कोणाला दान किंवा भेट म्हणून देऊ शकते किवा मृत्यूपत्रात कोणाच्याही नावे ठेवू शकते.

जर विधवेने दुसरे लग्न केले तरीही मृत नवऱ्याकडून तिला मिळालेली संपत्ती तिची स्वत:ची राहील.

## पत्नीला खर्चाचा अधिकार आहे का?

पत्नीला पतीकडून खर्चाची रक्कम घेण्याचा अधिकार आहे. जर नवऱ्याने बायकोला खर्च दिला नाही तर ती न्यायालयातर्फे नवऱ्याकडून खर्च घेऊ शकते. हा अधिकार हिंदू दत्तक आणि भरणपोषण अधिनियमांतर्गत (१९५६) दिला गेला आहे.

जर काही ठळक कारणांमुळे बायको नवऱ्यापासून वेगळी रहात असेल, तरीही खालील कारणांसाठी ती नवऱ्याकडे खर्च मागू शकते.

- नवऱ्याने तिला सोडून दिले आहे.
- नवऱ्याच्या दुर्व्यवहाराच्या भीतीने बायको वेगळी राहू लागली आहे.

- नवऱ्याला कुष्ठरोग आहे.
- नवऱ्याची आणखी एखादी जिवंत बायको आहे.
- नवऱ्याचे दुसऱ्या बाईबरोबर अनैतिक संबंध आहेत.
- नवऱ्याने धर्म बदलला आहे.

परंतु स्त्री स्वतः जर व्यभिचार केला असेल किवा तिने धर्म बदलला तर ती खर्च मागण्यास लायक रहात नाही.

## मुले, म्हाताऱ्या आई-वडिलांना खर्च मागण्यास अधिकार आहे का?

**(हिंदू दत्तक तथा भरण पोषण अधिनियम १९५६)**

- औरस किवा अनौरस अल्पवयीन (१८ वर्षाखाली वय असलेल्या) मुलांना आई-वडिलांकडून खर्च मिळवण्याचा अधिकार, हक्क आहे.
- म्हातारे किवा शारीरिकरीत्या दुर्बल आई-वडिलांना आपल्या मुलांकडून (मुलगा किवा मुलगी) खर्च घेण्याचा हक्क आहे.

ज्यांना आपल्या कमाईतून किवा संपत्तीतून स्वतःचा खर्च भागवता येत नाही. केवळ अशाच लोकांना हा खर्च घेण्याचा अधिकार आहे.

## विधवेला खर्च मिळवण्याचा अधिकार आहे का?

**(हिंदू दत्तक तथा भरण पोषण अधिनियम १९५६)**

जर हिंदू विधवा आपल्या कमाईने किवा संपत्तीतून आपला खर्च भागवू शकत नसेल तर खालील व्यक्तीकडून तिला खर्च मिळू शकतो.

- नवऱ्यांच्या संपत्तीतून किंवा त्याच्या आईवडिलांच्या संपत्तीतून.
- आपल्या मुलाच्या किवा मुलीच्या संपत्तीतून.

जर या लोकांकडून तिला खर्च मिळाला नाही तर तिच्या सासऱ्यांना तिचा खर्च द्यावा लागेल.

# हिंदू दत्तक तसेच भरण पोषण कायदा १९५६ *

**पू**र्वी एखादी स्त्री कोणाला दत्तक घेऊ शकत नव्हती, पण आता ह्या कायद्यामुळे पुरुषासारखेच स्त्रीही दत्तक घेऊ शकते.

## कधी ?

- ती विधवा, घटस्फोटिता किवा कुमारिका अशी हिंदू स्त्री असेल तर
- दत्तक घेणारी स्त्री मानसिक दृष्ट्या निरोगी असेल आणि तिचे वय कमीत कमी अठरा वर्षे असेल तर.
- ती विवाहित असेल तर तिचा नवराच दत्तक घेऊ शकतो. ती नाही.
- तिचा नवरा वेडा आहे, हिदू राहिलेला नाही (धर्म बदलला), संन्यासी झाला आहे, तर

## कसे मूल दत्तक घेता येते.

- मूल हिंदू असायला हवे. मुलगा/मुलगी काही असू शकते.
- मुलाला आधी कुणी दत्तक घेतलेले नसावे.
- त्याचे वय पंधरा वर्षाखालील असावे.
- त्याचे लग्न झालेले नसावे.
- जर एखाद्या पुरुषाला मुलगी दत्तक घ्यायची असेल तर त्याच्यात आणि मुलीत कमीत कमी एकवीस वर्षांचे अंतर असणे आवश्यक आहे. तसेच जर एखाद्या स्त्रीला मुलगा दत्तक घ्यायचा असेल तर तिच्या व मुलाच्या वयातही एकवीस वर्षांचे अंतर असायला हवे.

# स्त्री कोणत्या कारणांनी घटस्फोट घेऊ शकते ?

खालील कारणांनी न्यायालयाकडून घटस्फोट मिळू शकतो.

१. प्रतिपक्षाने विवाहानंतर स्वेच्छेने इतर व्यक्तींबरोबर लैंगिक संबंध ठेवणे.

२. प्रतिपक्षाने निर्दयतेची मानसिक शारीरिक क्रूर वागणूक देणे.

३. १ वर्षे पती पत्नीने विभक्त राहणे.

४. धर्म त्याग.

५. दुरुस्त न होणारी मानसिक विकृती

६. असाध्य घृणास्पद महारोग

७. संन्यास

८. प्रतिपक्षाबद्दल काही न कळणे

# काही विशिष्ट कारणांमध्ये पत्नीला पतीविरुद्ध घटस्फोट मिळू शकतो.

१. पती बलात्काराकरीता दोषी असेल तर.

२. पतीविरुद्ध पोटगीचा आदेश होऊन पतीपत्नी एकत्र १ वर्षे राहिले नाहीत तर.

३. पत्नीचे वय विवाहाचे वेळी १५ वर्षाचे आत असणे व १८ वर्षाचे आत विवाह रद्द व्हावा असा अर्ज तिने केला तर.

# परस्पर संमतीने घटस्फोट मिळतो का ?

पती पत्नी दोघेही एक वर्षापेक्षा अधिक काळ विभक्त रहात आहेत व संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे असा संयुक्त अर्ज केल्यावर घटस्फोटाच्या आदेशासाठी सहा महिने वाट पाहणे आवश्यक आहे. मग असा आदेश मिळू शकतो.

# घटस्फोटाचा अर्ज कुठे करायचा?

## कोणत्याही न्यायालयात घटस्फोट खटला दाखल करण्यासाठी -

१. त्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात विवाह होणे आवश्यक आहे.

२. अर्ज दाखल करण्याचे वेळी प्रतिपक्ष राहतो तेथेही खटला दाखल करता येतो.

३. दोन्ही पक्ष शेवटी जिथे एकत्र रहात होते तिथे खटला दाखल करता येतो.

## न्यायालयाकडे तक्रार करुन विभक्त रहाता येते का?

या प्रकारचा विभक्त राहण्याचा आदेश न्यायालयाकडून मिळविता येतो

## घटस्फोटाचा अर्ज केव्हा करता येतो ?

१. विवाहापासून एक वर्षानंतर.

२. विशेष कारणासाठी एक वर्षाआधी.

# विशेष विवाह कायदा म्हणजे काय ?

कोणत्याही धर्माचे दोन भारतीय नागरिक या कायद्यान्वये विवाह करु शकतात. या कायद्यातील इतर सर्व तरतुदी हिंदू विवाह कायद्यासारख्याच आहेत.

# मुसलमान विवाह कायदा म्हणजे काय?

इस्लामिक पद्धतीनुसार स्त्रियांस शरीयत कायदा लागू पडतो व विवाह व तलाक ह्या बाबतीत वैयक्तिक कायदा लागू आहे. हा कायदा म्हणजे करार मानला जातो.

एका विवाहेच्छू व्यक्तीने वा तिच्यातर्फे दुसऱ्यांस विवाहाची मागणी केली असता दुसऱ्या व्यक्तीने वा तिच्यातर्फे दुसऱ्याने ती स्वीकारण्यास हवी ही मागणी व स्वीकार एकाच बैठकीत किमान सज्ञान व जाणते दोन पुरुष वा एक पुरूष व  दोन स्त्रिया यांचे उपस्थितीत व्हावे.

मुसलमान पुरुष ४ स्त्रियांशी विवाह करु शकतो.

मुसलमान स्त्री एकाच पुरुषांशी विवाह करु शकते.

## कराराचे परिणाम

१. वराकडून वधुला मेहेर रक्कम मिळते.

२. वराने दुसरा विवाह केल्यास पहिला रद्दबातल ठरेल असा क़लम करार होऊ शकतो.

३. विशेष घटनेने हा विवाह रद्द करू शकतो.

४. मुळ विवाह पद्धतीमध्ये विशिष्ट कालावधीनंतर विवाह बंधन रद्द होते.

## निषिद्ध नाते

रक्ताच्या नातेवाईकांचे विवाहद्वारे निर्माण झालेले नाते, सहोदर संबंध निषिद्ध आहेत.

## घटस्फोट

१. परस्पर संमतीने मुबारक घटस्फोट घेतला जातो.

२. पत्नी पतीला काही मोबदला देऊन त्याच्या संमतीने मुक्त होऊ शकते.

३. तलाक़ हा हक्क पतीचा आहे. तीन वेळा हा शब्द उच्चारुन घटस्फोट देऊ शकतो, तोंडी तलाक दोन साक्षीदारांसमवेत देता येतो.

४. रजा ह्या प्रकारचा तलाक रद्द करता येतो.

५. धर्मांतर केल्यास विवाह बंधन नष्ट होते.

६. दुसऱ्या इसमामार्फत सुद्धा तलाक देऊ शकतो.

## मुसलमान पत्नीस असलेला अधिकार

१. पती ४ वर्षे बेपत्ता

२. दोन वर्षे दुर्लक्ष व त्रास

३. ७ वर्षे पतीस कारावास

४. नपुंसक

५. ३ वर्षे पती वेडा

६. पती महारोग, गुप्तरोगाने आजारी

७. क्रूर वागणूक

अ. मारहाण

ब. वाईट स्त्रियांची संगत, अनैतिक संबध

क पत्नीस जबरदस्तीने व्यभिचारास प्रवृत्त

ड तिच्या मालमत्तेची परस्पर विल्हेवाट लावणे

इ धार्मिक कृत्यास प्रतिबंध

ई व्यभिचाराचा खोटा आरोप

अनेक पत्नी असताना सर्वांना सारखी वागणूक नसेल तर पत्नीला तलाक घेतो येतो.

# ख्रिश्चन स्त्रियांविषयक विवाह व घटस्फोटाचे कायदे

पती पत्नीपैकी कोणीही ख्रिश्चन असल्यास ह्या कायद्याखाली विवाह करता येतो. चर्च व धर्मगुरुद्वारा विवाह होतो. ह्यामधील वेगळी अट घटस्फोटाबाबत आहे.

पत्नीने विवाहानंतर व्यभिचाराचे कृत्य केले ह्या एकाच कारणाकरीता पतीला घटस्फोटाची मागणी करता येते.

पतीने व्यभिचार केला ह्या एकाच कारणासाठी पत्नी घटस्फोट मागू शकत नाही.

१. कायद्याने विवाह करता येत नाही अशा स्त्रीबरोबर व्यभिचार करणे.

२. बहुपत्नीत्व

३. क्रूरता

४. बलात्कार वा अनैसर्गिक लैंगिक कृत्य

५. अर्जदाराचा दोन वर्षापेक्षा अधिक काळ त्याग

६. धर्मांतर

### पत्नीची संपत्ती

विभक्त झाल्यानंतर पत्नीने कमावलेली मालमत्ता पूर्णपणे तिच्याच ताब्यात राहते. कायदेशीर विभक्तपणाने विवाह रद्द होत नाही. दोघांचीही एकमेकांच्या मालमत्तेवर अधिकार व बंधने राहतात.

## पारशी स्त्रिया

### विवाह

१. वरवधू हे निषिद्ध नात्यातले नसावेत.

२. दोन पारसी साक्षीदाराच्या साक्षीने आशीर्वाद नामकासारंभाने विवाह होतो.

३. २१ वर्षाखालील लग्नासाठी पालकांची संमती आवश्यक आहे.

### घटस्फोट

१. विवाहानंतर १ वर्षेपर्यंत शरीरसंबंध नसणे.

२. प्रतिपक्ष विवाहाचे वेळी मनोदुर्बल आहे हे अर्जदारास माहीत नसणे.

३. प्रतिपक्षास विवाहाचे वेळी दुसऱ्या इसमापासून गर्भधारणा होणे व ती माहिती झाल्यावर पतीपत्नीतील संभोग बंद ठेवणे आवश्यक आहे. दावा तीन वर्षाच्या आत असावा.

४. प्रतिपक्षाचे अनैतिक संबंध असणे.

५. प्रतिपक्षाने अर्जदारास गंभीर दुखापत, गुप्तरोगाची लागण वा वेश्याव्यवसायास भाग पाडणे दावा मुदत २ वर्षाचे आत.

६. फौजदारी गुन्ह्याखाली ७ वर्षे शिक्षा.

७. धर्म सोडणे, अर्जदाराचा ३ वर्षे परित्याग.

इतर सर्व तरतुदी हिंदू विवाह कायद्याप्रमाणे आहेत.

# स्त्री शिक्षण *

देशाचा सर्वांगीण विकास हा त्यातल्या प्रत्येक घटकाला प्रगती करण्याची संधी दिल्यास लवकर होऊ शकतो. शिक्षण हे प्रगतीचे व्यापक माध्यम आहे. १८४८ साली म. फुले आणि सावित्रीबाईंनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. तेव्हापासून स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची जाणीव हळूहळू विकसित होत आहे.

भारतीय राज्य घटनेने प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आहे. आज शाळा नाही असे गाव महाराष्ट्रात तरी शोधून काढावे लागेल. महाराष्ट्रात मुलींना बारावी पर्यंतचे शिक्षण मोफत आहे. दहावी आणि बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. तरीही साक्षरतेची टक्केवारी काढली तर अजून ३५ टक्के स्त्रिया निरक्षर आढळतात.

## मुलींची गळती का होते ?

प्राथमिक शाळेपासून मुलींच्या गळतीला सुरुवात होते. त्याची कारणे खालीलप्रमाणे

- गरीबी
- पुस्तके - गणवेश - वह्या इ. चा अभाव
- धाकट्या भावंडांचा सांभाळ
- घरकाम
- वसतीगृहांची अपुरी सोय
- खर्चिक उच्च शिक्षण
- मुलींच्या शिक्षणावर खर्च करण्यात पालकांची उदासीनता
- सांस्कृतिक कारणे

# ही परिस्थिती बदलण्यासाठी शासनाने घेतलेले धोरणात्मक निर्णय

## जन्मतारखेचा दाखला नसला तर मुलाला शाळेत प्रवेश मिळेल का?

**जन्मतारखेच्या दाखल्याबाबत:** जन्मतारखेचा दाखला नाही म्हणून महाराष्ट्र शासनाने चालविलेल्या किंवा शासनाचे अनुदान असलेल्या कोणत्याही शाळेत प्रवेश नाकारला जाऊ शकत नाही. तसेच स्थानिक डॉक्टरांकडून किंवा आई-वडिलांनी जन्मतारीख लिहून दिली तरी शाळा त्याला मान्यता देते.

प्राथमिक शाळेत प्रवेश देताना खालील बाबी जन्मतारखेचा दाखला सादर करण्यास अपवाद समजाव्यात

१. ज्या कुटुंबातील पुरुष पालक नोकरी धंद्यानिमित्ताने परगावी आहेत व कुटुंबातील स्त्रिया पालक या नात्याने पाल्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी पाल्यांच्या जन्मतारखेचा दाखला प्राप्त करु शकत नाहीत.

२. ज्या विधवा, परितक्तया स्त्रिया पाल्यांचे एकमेव पालक असतील आणि त्या परिस्थितीत पाल्यांच्या जन्मतारखेचा दाखला सादर करण्यास असमर्थ असतील.

३. जी दारिद्रय रेषेखालील कुटुंबे राज्याच्या अन्य भागातून वा अन्य राज्यातून स्थानांतर केल्यामुळे वा विस्थापित झाल्यानंतर महाराष्ट्रातील एखाद्या भागात रहात असतील त्यांना त्यांच्या पाल्यांच्या जन्मतारखेचा दाखला सादर करणे शक्य नाही.

४. भटक्या कुटुंबांच्या बाबतीत किंवा पदपथ निवासी कुटुंबाच्या बाबतीत, ज्यांना त्यांच्या पाल्यांच्या बाबतीत जन्मतारखेचा दाखला उपलब्ध होत नाही.

५. जी मुले दत्तक दिली असतील व त्यांच्या जन्मतारखेबाबतचा कोणताच तपशील उपलब्ध नसेल.

## प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण धोरण म्हणजे काय?

इयत्ता पहिली ते चौथीमधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच त्या व्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित व भटक्या जाती व विमुक्त जमातीतील तसेच मागासवर्गीय व दारिद्रय रेषेखालील विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता देण्याबाबत **: शासन क्रमांक पी आर ई १०९१ / ९६१४/प्राशि**

### टळक वैशिष्ट्ये

पहिली ते चौथीमधील शाळेत जाणाऱ्या दारिद्रय रेषेखालील मुलींना शोळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिनिधी रु १/- या दराने उपस्थिती प्रमाणे पालकांना देण्यात येईल.

लाभधारक विद्यार्थिनीची किमान उपस्थिती त्या महिन्यातील एकूण शालेय दिवसांच्या ७५% असणे अनिवार्य आहे.

ही योजना गळतीचे प्रमाण कमी व उपस्थितीचे प्रमाण वाढवून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाला हातभार लावण्यासाठी आहे.

## पुस्तक पेढी योजना

पुस्तक पेढी योजना १९९४-९५ इ. १ ली, २ री, व ६ वी चे नवीन संच घेण्याबाबत.
**शासन निर्णय क्रमांक पी आर ई- १०९४/६४७०७/५४७-प्रशि १/ दि. २-७-९४.**

### टळक वैशिष्ट्ये

ही योजना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधून राबविली जाते.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता (नवबौद्ध धरुन अनु. जाती व जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती) उसनवारी तत्वावर विद्यार्थ्यांना परतफेडीच्या अटीवर एका वर्षाकरिता पुस्तके पुरवण्याचा निर्णय १९७७-७८ मध्ये घेतला आहे.

या निर्णयानुसार १९९४-९५ या वर्षासाठी इ. १ ली, २ री, व ६ वी मधील विद्यार्थ्यांकरता पुस्तकांचे नवे संच घेण्यास शासनाच्या निर्णयाद्वारे मंजुरी.

# मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

शासकीय व अशासकीय मान्यताप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये १२ वी पर्यंतचे शिक्षण मुलींना मोफत करणे

**शासन निर्णय क्रमांक : १०८४ /२५६८ /सा -५**

**ठळक वैशिष्ट्ये**

उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण मोफत.

योजनेखाली शिक्षण फी, सत्र फी, प्रवेश फी, प्रयोगशाळा फी प्रमाणित दराइतकी माफ करण्यात येईल.

यासाठी ते कुटुंब महाराष्ट्रात किमान १५ वर्षे रहिवासी असले पाहिजे.

एखाद्या वर्षी अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनींची सवलत या वर्षापुरती मागे घेऊन उत्तीर्ण होऊन पुढील वर्गात केल्यावर पुन्हा सुरु होऊ शकते.

# मोफत प्रवास योजना म्हणजे काय ?

ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी एस. टी. ने मोफत प्रवास करण्याची सवलत सन १९९६ -९७ या शैक्षिणिक वर्षापासून देण्यासाठी अहिल्यादेवी होळकर मुलींना मोफत प्रवास योजना (शा. शि. वि. शा. नि. दि. १३ ऑगस्ट १९९६)

# मुलींसाठी वसतीगृह

तालुक्याच्या ठिकाणी ५० मुलींची सोय असलेले प्रियदर्शिनी वसतीगृह सुरु करणे.
**शासन निर्णय क्रमांक १०९० /१५६१३३ /८४१ /वि. शि. दि. १८-९-९५**

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५०-१०० मुलींची सोय असलेले प्रियदर्शिनी वसतीगृह सुरु करणे.

सेवाभावी अशासकीय संस्था, शैक्षणिक संस्थानीच पुढे येऊन दोन एकर जागा उपलब्ध करून दिली तर शासनातर्फे वसतीगृहाची इमारत बांधून दिली जाईल.

व्यवस्थापन संस्थेकडे सुपूर्द केले जाईल.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म. रा. पुणे या निर्णयाच्या अंमलबजावणीस जबाबदार राहतील.

या वसतीगृहात मागासवर्गीयासाठी जागा राखून ठेवाव्या लागतील.

प्रवेश घेणाऱ्या मुलींकडून कोणत्याही प्रकारची देणगी घेण्यात येणार नाही.

वसतीगृहाला परवानगी मिळाल्यानंतर त्याला अनुदान देण्यात येईल.

# ग्राम विकास समितीची भूमिका

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत ग्राम विकास समित्यांची स्थापना :
**शासन निर्णय क्रमांक १०८७/४१०२५२/८४२४/प्राशि १/दि. ७-९-९१**

## ठळक वैशिष्ट्ये

स्थापना ग्रामीण भागात शिक्षणाच्या क्षेत्रात स्थानिक समाजाचा सहभाग वाढावा म्हणून.

सुमारे ५००० लोकवस्तीसाठी एक याप्रमाणे ग्राम शिक्षण समिती स्थापन होऊ शकते.

ह्या समितीची मुदत ३ वर्षे राहील.

समितीने शैक्षणिक गरजांचे सर्वेक्षण करणे, शैक्षणिक विकासाचे आपत्कालीन व दीर्घकालीन नियोजन करणे, पटनोंदणी मोहीम हाती घेणे आदी कार्ये करणे अपेक्षित आहे.

## विशेष समस्या असलेले गट

**१) देवदासींच्या इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या मुला - मुलींना गणवेशाचे संच व लेखनसाहित्य याकरिता शासनामार्फत खालील दराने अनुदान देण्यात येते.**

| | | |
|---|---|---|
| अ) क्रमिक पुस्तके | रु. ७५ | प्रति विद्यार्थी |
| ब) वह्या | रु. ७० | प्रति विद्यार्थी |
| क) इतर शालेय साहित्य | रु. ५० | प्रति विद्यार्थी |
| ड) गणवेश | रु. १०५ | मुलांसाठी |
| इ) गणवेश | रु. २०५ | मुलांसाठी |

अनुदान मंजुरीचे अधिकार जिल्हा महिला बालकल्याण अधिकाऱ्यांना आहेत.

## २) देवदासींच्या मुला-मुलींकरता वसतिगृह

ही गडहिंग्लज, जि. कोल्हापूर व जत, जि. सांगली येथे आहेत.

प्रत्येक लाभधारकास रु २५०/-प्रमाणे अनुदान दिले जाते.

इमारत भाडे आणि साधन सामुग्रीसाठीही अनुदान मंजूर होते.

अपारंपारिक क्षेत्रात स्त्रियांनी तांत्रिक कौशल्य संपादन करायला हवे या हेतूने मुलींच्या तंत्रशिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले आहे. सध्या महाराष्ट्रात फक्त ६ते १७ टक्के मुली तंत्रशिक्षण निकेतनात प्रवेश घेतात. बहुसंख्य मुली तंत्रशिक्षणाकडे वळत नाहीत कारण

- तंत्रनिकेतनांमध्ये निवासी व्यवस्थेचा अभाव.
- पालकांमधील जाणीव आणि त्यांच्या प्रोत्साहनाचा अभाव.
- उद्योग आणि शिक्षणसंस्था यातील समन्वयाचा अभाव.
- शिक्षणाचा अफाट खर्च

# समान वेतनाचा अधिकार *

जर एखाद्या नागरिकाच्या मूलभूत हक्कांची अवहेलना झाली तर तो कायद्याची मदत घेऊ शकतो. अशा प्रकारची केस हायकोर्ट (उच्च न्यायालय) किंवा सुप्रीम कोर्ट (सर्वोच्च न्यायालय) मध्ये दाखल केली जाऊ शकते.

# काम करणाऱ्या स्त्रियांचे अधिकार

प्रत्येक स्त्री काहीतरी काम करते. घरकाम तर ती करतेच, परंतु बऱ्याच वेळा पैसे कमविण्यासाठी तिला घराबाहेरही जावे लागते. काम करणाऱ्या स्त्रीला स्त्रीला आपल्या अधिकारांची माहिती असायला हवी. हे अधिकार भारताच्या घटनेने दिलेले आहेत. त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून वेगवेगळे कायदेही आहेत.

## हे अधिकार कोणते ?

काम करणाऱ्या प्रत्येक स्त्री वा पुरुषाला, काम करण्यासाठी वेतन वा मजुरी मिळाली पाहिजे.

हे वेतन सरकारने ठरविलेल्या किमान वेतनाएवढे हवे.

समान कामाला समान वेतन मिळाले पाहिजे. म्हणजे एकाच कामाला किंवा एकसारख्या कामाला, स्त्रीला पुरुषांइतकेच वेतन मिळायला हवे. कमी नाही.

स्त्रियांना गरोदरपणा व प्रसूतिच्या संबंधित काही खास अधिकार दिलेले आहेत

## किमान वेतन (किमान मजुरी अधिनियम १९४८)

नेहमी असं दिसून येत होतं की मजुरांना काम केल्यावरही कमी मज़ुरी दिली जात होती किंवा अगदी नाममात्र रक्कम दिली जात होती. अशाप्रकारे मजुरांचे शोषण केले जात होते. हे शोषण थांबविण्यासाठी असा कायदा केला की ज्याद्वारे मजुरांना त्यांनी केलेल्या कामासाठी, सरकारने जितकी मजुरी ठरविली आहे ती प्राप्त व्हावी. ह्यालाच किमान वेतन मजुरी कायदा म्हणतात.

## किमान वेतनाचा हक्क कोणाला आहे?

- हंगामी काम करणाऱ्यांसाठी म्हणजे दगड फोडणाऱ्यांना किवा रस्ते बनविणाऱ्यांना.
- कामाच्या नगावर ज्यांना पैसे मिळतात - म्हणजे बीडी खाण कामगार किवा घराचे बांधकाम करणाऱ्यांना.
- कॉन्ट्रक्ट (कंत्राटी कामगार) वर काम करणारे - म्हणजे खाण कामगार किवा घराचे बांधकाम करणाऱ्यांना
- ठेकेदाराकडे काम करणाऱ्यांना
- मळ्यात वा बीडीच्या कारखान्यात काम करणाऱ्यांना
- शेतीचे काम करणाऱ्या कामगारांनाही हा कायदा लागू होतो.

किमान वेतनाचे पैसे, काम करणाऱ्या व्यक्तीच्या वयावरुन ठरविले जातात. म्हणजे-

- १४ वर्षाखालील व्यक्तीसाठी
- १४ ते १८ वर्षे पर्यंतच्या व्यक्तीसाठी

# स्त्रियांना संरक्षण देणारे
# भारतीय दंड विधानातील विशेष कायदे

| अ.क्र. | अपराधाचे स्वरूप | कलम भा.द.वि. | अधिकाधिक शिक्षा |
|---|---|---|---|
| १. | बलात्कारासारख्या अपराधामधील अत्याचारपिडीत स्त्रीस नाव किंवा ओळख देणारी माहिती छापणे किंवा प्रसिद्ध करणे | २२८ अ | २ वर्ष सजा किंवा दंड |
| २. | स्त्रीकडे पाहून सार्वजनिक ठिकाणी अश्लील किंवा असभ्य हातवारे करणे/गाणी म्हणणे. | २९४ | तीन महिन्याची सजा किंवा दंड |
| ३. | हुंडा मागणे | हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ | तीन वर्षाची सजा किंवा दंड १५,००० /- रुपये |
| ४. | हुंडाबळी | ३०४ बी | जन्मठेप |
| ५. | स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात | ३१३ | जन्मठेप किंवा १० वर्षे सजा व दंड |
| ६. | स्त्रीच्या संमतीशिवाय केलेल्या गर्भपाताच्या वेळी स्त्रीचा मृत्यू | ३१४ | ७ वर्ष सजा किंवा जन्मठेप, दंड |
| ७. | पत्नीला मारहाण, सामान्य जखमा | ३२३ | ५ वर्ष तुरुंग - रु. १०,०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही |
| ८. | पत्नीला मारहाण, गंभीर जखमा | ३२५ | ७ वर्ष सजा, दंड |
| ९. | अवैधरित्या ताब्यात बंद करुन ठेवणे ज (अडथळा निर्माण करणे) | ३४० | १ महिना सजा रु. ५००/- पर्यंत दंड किंवा सजा व दंड दोन्ही |
| १०. | अवैधरित्या डांबून ठेवणे | ३४२ | १ वर्ष सजा १,०००/- रु.पर्यंत दंड किंवा दोन्ही |
| ११. | हल्ला करणे किंवा गुन्हेगारी ताकदीचा उपयोग करुन स्त्रीचा विनयभंग करणे | ३५४ | २ वर्ष सजा व दंड |
| १२. | अपहरण | ३६३ | ७ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| १३. | अल्पवयीन मुलीचे अपहरण | ३६३ अ | ७ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| १४. | खून करण्यासाठी अपहरण करणे किंवा पळवून नेणे | ३६४ | १० वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| १५. | विवाहासाठी सक्तीने स्त्रीला पळवून नेणे, अपहरण करणे,जबरदस्ती करणे | ३६६ | १० वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| १६. | अल्पवयीन मुलींना विवाहासाठी पळवणे | ३६६ अ | १० वर्ष सजा,दंड |
| १७. | परदेशातून मुली पळवून आणणे | ३६६ अ | १० वर्ष सजा,दंड दोन्ही |

| अ.क्र. | अपराधाचे स्वरूप | कलम भा.द.वि. | अधिकाधिक शिक्षा |
|---|---|---|---|
| १८. | अल्पवयीन मुलींना त्यांच्या जवळील वस्तूंची चोरी करण्यासाठी पळविणे | ३६९ | ७ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| १९. | एखादया मुलीला किंवा स्त्रीला गुलाम बनविण्यासाठी विकत घेणे किंवा तिची विल्हेवाट लावणे | ३७० | ७ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २०. | अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसायासाठी विकणे | ३७२ | १० वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २१. | अल्पवयीन मुलगी वेश्या व्यवसायासाठी विकणे,घेणे | ३७३ | १० वर्ष सजा, दंड किंवा दोन्ही |
| २२. | बलात्कार | ३७६ | ७ ते १० वर्ष सजा, दंड किंवा दोन्ही |
| २३. | कायद्याने वेगळे राहणाऱ्या पत्नीबरोबर संभोग | ३७६ अ | २ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २४. | आपल्या अधिकाराखालील पब्लीक सर्व्हंट बरोबर संभोग करणे (कस्टडीरेप) | ३७६ बी | ५ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २५. | तुरुंगाधिकारी किंवा रिमांडहोमच्या अधिकाऱ्या-मार्फत अधिकारातील स्त्रीशी केलेला संभोग | ३७६ सी | ५ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २६. | एखाद्या रुग्णालयातील व्यवस्थापन सदस्याने रुग्णालयातील स्त्रीशी केलेला संभोग | ३७६ डी | ५ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २७. | कायदेशीर विवाह आहे असे भासवून एखाद्या स्त्रीला फसवून तिला तिच्या सोबत पुरुषाने फसवून राहणे | ४९३ | १० वर्ष सजा, दंड किंवा दोन्ही |
| २८. | अवैधरित्या दुसरी पत्नी करणे | ४९४ | ७ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| २९. | व्दिभार्या प्रतिबंधक कलम - पहिले लग्न लपवून दुसरी पत्नी करणे | ४९५ | १० वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| ३०. | कायदेशीर विवाह नसताना विवाहाचा समारंभ घडविणे | ४९० | ७ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| ३१. | व्याभिचार | ४९७ | ५ वर्ष सजा ,दंड किंवा दोन्ही |
| ३२. | विवाहित स्त्रीला गुन्हेगारी वृत्तीने अटकाव करणे किंवा घेवून जाणे | ४९८ | २ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| ३३. | नवविवाहितेचा हुंडयासाठी किंवा इतर कारणाने शारिरीक किंवा मानसिक छळ | ४९८ अ | ३ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |
| ३४. | एखाद्या स्त्रीचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्याकडे पहाणे,शब्द उच्चारणे/कृती करणे | ५०९ | १ वर्ष सजा,दंड किंवा दोन्ही |

# युएनएफपीए आणि केंद्र शासन सहाय्यित एकात्मिक महिला सक्षमीकरण कार्यक्रमा अंतर्गत असलेले जिल्हे व तालुके

| अ.क्र. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १. | ठाणे | १. वाडा |
| २. | रायगड | १. कर्जत |
| ३. | पुणे | १. जुन्नर<br>२. इंदापूर |
| ४. | सोलापूर | १. अक्कलकोट |
| ५. | उस्मानाबाद | १. उमरगा |
| ६. | नांदेड | १. किनवट |
| ७. | नाशिक | १. नाशिक (ग्रामिण)<br>२. सुरगाणा<br>३. नाशिक (शहरी) |
| ८. | अहमदनगर | १. अकोले |
| ९. | बुलढाणा | १. चिरवली |
| १०. | अमरावती | १. धारणी |
| ११. | यवतमाळ | १. यवतमाळ |
| १२. | चंद्रपूर | १. भद्रावती<br>२. चंद्रपूर |
| १३. | भंडारा | १. देवरी |
| १४. | गडचिरोली | १. अहेरी<br>२. एटापल्ली<br>३. आरमोरी |

Designed & Printed by PRINTBOOK (022) 640 8439

- संकलन आणि निर्मिती (संयुक्त)

✦ **महिला व बालविकास विभाग,** महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -३२.

✦ **महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (माविम),** मुंबई.

- लेखन सहाय्य

✦ श्रीमती ज्योती म्हापसेकर